# वधस्तंभाचे परीक्षण

## आणि वधस्तंभाचा सामना



ख्रिस्ताच्या वधस्तंभाचा प्रभाव आणि अर्थ

एड्रियन एबेन्स

*हे पुस्तक माझे प्रिय मित्र टोर आणि आझादेह यांना समर्पित आहे.*

**fatheroflove.info**

एड्रियन एबेन्स, 2020

Copyright © 2019, 2020, एड्रियन एबेन्स

लेखकाचा नैतिक हक्क सांगितला आहे.

सर्व हक्क राखीव. या प्रकाशनाचा कोणताही भाग व्यावसायिक फायद्यासाठी, प्रकाशक आणि कॉपीराइट धारकांच्या पूर्व लेखी परवानगीशिवाय, इलेक्ट्रॉनिक, मेकॅनिकल, फोटोकॉपी, रेकॉर्डिंग किंवा अन्यथा कोणत्याही स्वरूपात प्रसारित करण्यासह, पुनरुत्पादित केला जाऊ शकत नाही. कृपया लक्षात घ्या की लेखकाने त्या ग्रंथांमधून एकत्रित केलेल्या विशिष्ट मुद्द्यावर जोर देण्यासाठी वचनांचे भाग ठळकपणे अधोरेखित केले आहेत.

अन्यथा ओळखल्याशिवाय, पवित्र शास्त्रातील अवतरण न्यू किंग जेम्स आवृत्तीमधून घेतले जातात. कॉपीराइट © 1982 थॉमस नेल्सन, इंक. परवानगीने वापरलेले आहेत. सर्व हक्क राखीव.

हे आणि इतर सर्व पुस्तके फादर ऑफ लव्ह प्रकाशनाद्वारे आमच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत fatheroflove.info
अतिरिक्त प्रती ऑर्डर करण्यासाठी कृपया adrian@life-matters.org वर ईमेल करा.

हे पुस्तक शेन विनफिल्ड/ॲडव्हेंट ह्यांनी डिझाईन केलेले आहे आणि डनुटासन ब्राउन, रिचर्ड रॉबिसन आणि लॉरेल एबेन्स ह्यांनी ह्या पुस्तकाचे पुनर्वाचन केले होते.
iStockphoto द्वारे कव्हर फोटो मिळाले आणि मेरीना क्रियुचेन्को द्वारे अंतर्गत चित्रे—Dreamstime.com

एड्रियन एबेन्स, 2020

Copyright © 2019, 2020, एड्रियन एबेन्स

लेखकाचा नैतिक हक्क सांगितला आहे

सर्व हक्क राखीव. या पुस्तकाचा कोणताही भाग लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय खालील उल्लेख केलेल्या मार्गांनी वापरणे प्रतिबंधीत आहे. डेटाबेस आणि पुनर्प्राप्ती प्रणालीद्वारे प्रसारित केलेल्या कोणत्याही स्वरूपाचे साधन (इलेक्ट्रॉनिक, यांत्रिक, फोटोकॉपी, रेकॉर्डिंग) इत्यादी. याखेरीज लेख किंवा गंभीर पुनिावलोकन यांमध्ये अवतरणाचा वापर केला जाऊ शकतो.

MARANATHA
MEDIA

अधिक माहितीसाठी संपर्क

maranathamedia.com

# सामग्री

धडा 1

पित्या त्यांना क्षमा कर....................................................4

धडा 2

त्याला वधस्तंभी खिळा!..................................................9

धडा 3

त्यांच्या सर्व दु:खाने तो दु:खी झाला................................13

धडा 4

तुम्ही माझ्याबरोबर एखादा तासही पाहू शकत  नाही काय? 19

धडा 5

होम व अर्पण ह्यांत तुझी इच्छा नव्हती.......................... 23

धडा  6

आमच्याकडे नियमशास्त्र आहे...................................... 35

धडा 7

जसे मोशेने वाळवंटात सर्प उंचविला............................... 47

धडा 8

हे देवा, तुझे मार्ग पवित्र आहेत.......................................53

धडा 9

सेलाह...........................................................................60

# पित्या त्यांना क्षमा कर

माझ्या मनात खेदाची भावना निर्माण करणाऱ्या काही प्रतिमा चमकल्या. माझ्या आजूबाजूच्या लोकांसोबत असलेल्या माझ्या वाईट संवादाच्या आठवणींची वाढती संख्या माझ्यावर भारी पडू लागली होती. माझा शांततेचा शोध आता जोरात सुरू होता. माझ्या रागाच्या उद्रेकांबद्दल विचार केल्याने मला स्वतःबद्दल वाईट वाटले आणि मला एक वेगळी व्यक्ती बनण्याची इच्छा जाणवली. त्या क्षणी माझ्या मनात "क्षमा" हा शब्द प्रकट झाला आणि मला त्याची गरज भासली.

तुम्ही कधी तुमच्या जीवनात अशा टप्प्यावर आला आहात का जिकडे तुम्हाला हे जाणवते की जी व्यक्ती तुम्ही आता आहात ती तुम्हाला आवडत नाही, आणि स्वत:ला बदलण्याचा अनेकदा प्रयत्न केल्यानंतरही तुम्ही पुन्हा त्याच अवस्थेत त्याच ओझ्या भावनेने पोहोचता? तुम्ही स्वतःमध्ये पाहत असलेल्या ह्या त्रासदायक प्रतिमेपासून तुम्ही कसे मुक्त व्हाल?

हा अनुभव पवित्र शास्त्रामधील शब्दांना सत्य ठरवतो..

> *शास्त्रात असे लिहिलेले आहे की, "नीतिमान कोणी नाही, एकदेखील नाही; समंजस कोणी नाही, देवाचा शोध झटून करणारा कोणी नाही; सर्व बहकले आहेत, ते सारे निरुपयोगी झाले आहेत; सत्कर्म करणारा असा कोणी नाही, एकही नाही." रोमकरांस 3:10–12*

असे बरेच लोक आहेत जे स्वतःच्या चारित्रामध्ये असलेल्या दोषांकडे डोळेझाक करून इतरांच्या दोषांवर लक्ष केंद्रित करण्याद्वारे ह्या स्थितीतून सुटू इच्छितात. आपल्या प्रत्येकामध्ये वाईट गुण असतात, त्यामुळे कठीण परिस्थितीसाठी इतरांना दोष देणे व दुसऱ्या व्यक्तीमध्ये काहीतरी शोधणे सोपे आहे. अशा प्रकारे शांती मिळवण्याचा प्रयत्न केल्याने आपल्या इतरांशी असलेल्या नातेसंबंधांना दुखापत होईल आणि आपण आणखी दुःखी आणि एकटे होऊ.

शांतता आणि स्वातंत्र्याचा एकमेव मार्ग म्हणजे आपल्या स्वतःच्या समस्यांची जबाबदारी घेणे आणि आपल्या निर्मात्याकडून क्षमा मागणे.

> *मग तो तोंड उघडून त्यांना शिकवू लागला. "जे आत्म्याने 'दीन' ते धन्य, कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. 'जे शोक करीत आहेत' ते*

*धन्य, कारण 'त्यांचे सांत्वन करण्यात येईल.' मत्तय 5:2–4*

मी नेमक्या ह्याच अवस्थेत दु:खी होतो कारण मी स्वार्थी होतो आणि इतरांनी दिलेल्या वेदनांबद्दल मी शोक करत होतो.

मी एका ख्रिस्ती घरात लहानसा मोठा झालो आणि मला येशू ख्रिस्तामध्ये प्रकट झालेल्या देवाच्या प्रेमाबद्दल शिकवले गेले होते. आणि लहानपणी मी हे शब्द अनेकदा ऐकले होते कि:

*अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हांला विसावा देईन. मत्तय 11:28*

माझ्या ओझ्यापासून आराम मिळवण्यासाठी मी येशूकडे येऊ शकतो ह्या विचाराने मला प्रोत्साहन मिळाले. मी ख्रिस्ताच्या जीवनावर आणि विशेषतः त्याच्या मृत्यूशी संबंधित असलेल्या शेवटच्या दृश्यांवर विचार करायला सुरुवात केली. वधस्तंभाच्या कथेमध्ये एका तुटलेल्या आत्म्यासाठी प्रचंड शक्ती आहे जो स्वतःला वाचवण्याच्या प्रयत्नांमधे थकून गेला आहे. वधस्तंभाने लाखो लोकांचे जीवन बदलून त्यांना शांती आणि आशा दिली आहे. तरीही त्यात एक रहस्य आहे. 2000 वर्षांपूर्वीचा विश्वासघात, अत्याचार आणि एका निष्पाप माणसाच्या कत्तलीची कहाणी माझ्या आत्म्याला शांती कशी देईल? आणि हे आज माझ्या जीवनाशी कसे संबंधित आहे?

ही कथा सुरुवातीला विचित्र वाटते. अशी शांतता मिळण्यासाठी मधुर सुगंधी आणि निसर्ग सौंदर्याने वेढलेल्या शांततेच्या जागी प्रवेश करणे हे अधिक अर्थपूर्ण वाटत नाही का? वधस्तंभाची कहाणी आत्म्यात जिवंत झाल्यावर, आपल्याला सैनिकांच्या ओरडण्याचे आवाज ऐकू येतात, ख्रिस्ताच्या पाठीमध्ये मारलेल्या चाबकाचा मोठा आवाज, आणि तारणारा बेहोश होत असताना जमिनीवर पडलेल्या त्या मोठ्या लाकडी वधस्तंभाचा भयंकर आवाज ऐकू येतो. तेथे असलेल्या  जमावाची थट्टा आपण ऐकतो आणि क्रूरतेच्या दृश्यांमध्ये आनंदित होणाऱ्या चेहऱ्यांचे आपण साक्षीदार होतो.

यामागचे रहस्य काय आहे? ही कथा मला शांती कशी देईल? एका कत्तलीतून निर्मळता कशी प्राप्त होऊ शकते?

ह्या दृश्यावरून नजर हटवण्याची आपली तीव्र इच्छा आहे आणि तरीही तेथे ही शक्ती आहे जी आपल्याला या नाटकातील खेळ पाहण्यासाठी प्रवृत्त करते. ही क्रूरता आणि भयानकता आपल्याला कशीतरी परिचित आहे. आम्ही कवटीच्या ठिकाणी पोहोचतो - गोलगोथा. ख्रिस्त नम्रपणे छळाच्या या साधनावर झोपतो; जमावाने त्याच्या डोक्यात मारलेल्या काट्यांचा मुकुटामुळे त्याच्या चेहऱ्यावरून रक्त वाहत आहे. त्याच्याबरोबर हा त्रास सहन करणारे पुरुष अपरिहार्यपणे विलंब व प्रतिकार करण्याचा प्रयत्न करतात. थोड्याच वेळापूर्वी मारलेल्या

फटक्यांमुळे तारणाऱ्याची पाठ ओळखता येत नाही. परंतु ह्याने असे काय केले ज्यामुळे त्याला ह्या वेदना दिल्या जात आहेत?

येशु ख्रिस्ताच्या शिकवणीद्वारे वाचलेले एक लहान वचन, दयाळूपणाने भरलेले जीवन आणि स्वर्गातील त्याच्या पित्याचे चित्रित केलेले सर्वात सुंदर आणि प्रेमळ चरित्र प्रकट करते. मग ह्या रानटी वागणुकीला अश्या मनुष्याने सामोरे जावे हे कसे शक्य आहे?

धातूवरील धातूचा तो जोराचा आवाज आपले लक्ष वेधून घेतो कारण त्या कोमल हातांनी अनेकांना आशीर्वाद दिले होते. इस्रायलच्या रस्त्यांवरून चालणारे ते मौल्यवान पाय आता छेदले गेले आणि लाकडी वधस्तंभाला खिळले गेले होते. पवित्र शास्त्रात नोंदवण्यासाठी व लाखो लोकांना सांगण्यासाठी ही ऐतिहासिक घटना चिन्हांकित करून वधस्तंभाला हिंसक रीतीने उंचावले गेले.

माझ्या अपराधापासून मुक्त होण्याच्या ह्या शोधात मी वधस्तंभाच्या घटनांचा विचार करत असताना, माझे हृदय या निर्दोष मनुष्याच्या सहानुभूतीने बाहेर पडले हा मनुष्य जो देवाचा पुत्र देखील आहे. माझ्या मनाने गेथसेमेनी बागेपासून ते कालवरी पर्यंतची त्याची पावले शोधली. मी रोमन अधिकारी पिलाताच्या शब्दांवर विचार केला:

> *"पाहा, हा मनुष्य!"* योहान *19:5*

मी त्याला जमिनीवर पडताना आणि वेदनेमुळे त्याला रक्ताचा घाम फुटताना पहिले. त्याचे शिष्य पळून जाताना आणि त्याला जमावाच्या हाथी देताना मी पाहिले. मला आश्चर्य वाटले की लोक बरब्बास कसे निवडू शकतात आणि देवाच्या पुत्राला वधस्तंभावर कसे खिळू शकतात. ते असे का करत आहेत? ह्या मृत्यूस पात्र होण्यासाठी त्याने कोणते वाईट केले आहे? लोकांद्वारे त्याची मारहाण, शिवीगाळ व थट्टा, उडवताना मी पाहिले:

> त्यांनी त्याची वस्त्रे काढून त्याच्या अंगात किरमिजी झगा घातला*;* काट्यांचा मुकुट गुंफून त्याच्या मस्तकावर ठेवला*,* त्याच्या उजव्या हातात वेत दिला आणि त्याच्यापुढे गुडघे टेकून*, '*हे यहूद्यांच्या राजा*,* नमस्कार*!'* असे म्हणून त्यांनी त्याची थट्टा मांडली*.* ते त्याच्यावर थुंकले व तोच वेत घेऊन ते त्याच्या मस्तकावर मारू लागले*.* मग त्याची थट्टा केल्यावर त्यांनी त्याच्या अंगातून तो झगा काढून त्याची वस्त्रे त्याच्या अंगात घातली आणि ते त्याला वधस्तंभावर खिळण्याकरता घेऊन गेले*.* मत्तय *27:28–31*

या नाटकातील निर्दयी कलाकारांना दोष देण्याचा माझा मोह प्रबळ होता, परंतु

मी नंतर इतरांबद्दल माझ्या स्वतःच्या निर्दयी वागणुकीचा विचार केला आणि मला लक्षात आले की मी त्यांच्यासारखाच दोषी आहे. मग ख्रिस्ताचे हे शब्द लक्षात येतात:

> "'मी तुम्हांला खचीत सांगतो की, ज्या अर्थी तुम्ही ह्या माझ्या कनिष्ठ बंधूंपैकी एकाला केले, त्या अर्थी ते मला केले आहे.' मत्तय *25:40*

मी हसलो नाही काय आणि इतरांची थट्टा उडवली नाही काय? मी क्रूरतेचे चित्रण करणारे चित्रपट पाहिले नाही काय आणि ज्यांना मी विलन समजतो त्यांच्या मृत्यूने मला आनंद झाला नाही काय? ज्यांनी माझ्यावर अन्याय केला आहे त्यांच्याबद्दल माझ्या ओठातून कटू शब्द पडले नाहीत काय? हे वाचताना माझी निषेधाची भावना वाढत गेली. जेव्हा मी येशूच्या बरोबरीने मरणाऱ्या दोन माणसांवर चिंतन केले तेव्हा मला त्या माणसाच्या शब्दांची ओळख झाली ज्याने म्हटले:

> आपली शिक्षा तर यथान्याय आहे; कारण आपण आपल्या कृत्यांचे योग्य फळ भोगत आहोत; परंतु ह्याने काही अयोग्य केले नाही." लूक *23:41*

जेव्हा मी ख्रिस्ताला वधस्तंभावर पाहिले तेव्हा इतरांबद्दलचे माझे भूतकाळातील निर्णय व धिक्कार माझ्याकडे शक्तिशाली शक्तीने परत आले. मला येशूच्या ह्या शब्दांचा प्रभाव जाणवला:

> "कारण ज्या प्रकारे तुम्ही दोष काढाल त्या प्रकारेच तुमचे दोष काढण्यात येतील आणि ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हांला मापून देण्यात येईल. मत्तय *7:2*

एका क्षणात मी वधस्तंभाने मोहित झालो. या घटनेला अक्षरशः 2000 वर्षे झाली असली तरी नाटकाचा साक्षीदार म्हणून मी स्वतः तिथे असल्याचे मला जाणवले. माझे जग मंद झाले आणि वधस्तंभाभोवतीचा आवाज आणि गोंधळ शांत झाला कारण मी देवाच्या पुत्राकडे पाहिले आणि त्या सुंदर चेहऱ्याचा अभ्यास केला, तेव्हा त्याच्या ओठातून हे शब्द बाहेर पडतात:

"हे बापा, त्यांना क्षमा कर; कारण ते काय करतात हे त्यांना समजत नाही." लूक *23:34*

ह्या शब्दांचे महत्त्व माझ्या आत्म्यात शिरले आणि, माझ्या मनात आशेची एक ठिणगी पेटली. जी क्षमाशीलता मला खूप पूर्वीपासून हवी होती ती माझ्यासमोर

स्पष्टपणे सादर करण्यात आली. माझ्या गालावरून अश्रू वाहत असताना मी माझ्या निर्मात्यासमोर गुडघे टेकले, मी प्रेमाच्या त्या चेहऱ्याकडे पहिले आणि माझे हृदय कनवाळले. त्या चेहऱ्यात निंदेचा एक दाग देखील नव्हता. मला या वास्तविकतेची तीव्र जाणीव होती की माझे पापी जीवनच त्याला वधस्तंभावर दुःख सहन करण्याचे एक कारण होते आणि तरीही त्याने कोणतीही निंदा केली नाही - फक्त क्षमा आणि प्रेम केले.

माझ्यामुळे त्याला झालेल्या दुःखासाठी त्याने मला दोष दिला नाही. त्याने मला मोकळेपणाने माफ केले. प्रश्न असा होता व आहे की, मी ते स्वीकारू शकेल काय? मला क्षमा झाली आहे यावर मी विश्वास ठेवू शकेल काय? माझ्या बाबतीत मी ते दोन्ही हातांनी माझ्या अनंतकाळच्या जीवनाचा वारसा म्हंणून स्वीकारले. मी येशूला सांगितले की मी जे केले त्याबद्दल मला खेद वाटतो आणि मी त्याला माझ्या जीवनाचा प्रभु होण्यास सांगितले. ताबडतोब माझ्यावर एक शांतता पसरली, इतकी बरी, इतकी शांत, व मोकळीक. अपराधीपणाचे ओझे जे मला चिरडत होते ते नाहीसे झाले आणि मला माझ्या आत्म्यात एक आनंद वाटला ज्याचे वर्णन करता येणार नाही परंतु जे त्याला स्वीकारतात त्यांना ते अनुभवता येईल.

जिवंत पाण्याच्या झऱ्याप्रमाणे माझ्या डोळ्यांतून कृतज्ञतेने अश्रू ओघळले. जी शांतता मी शोधत होतो ती शेवटी मला मिळाली. मला वाटलेली कृतज्ञता अफाट होती आणि मी आनंदाने माझ्या तारणकर्त्याच्या प्रभुत्वास समर्पित झालो.

ही वधस्तंभाशी माझी आशीर्वादित आणि सुंदर अशी भेट होती, आणि आहे. त्यातून अनेक प्रश्न निर्माण होतात. एवढ्या भयानक गोष्टीतून एवढी सुंदर गोष्ट कशी निर्माण होऊ शकते? 2000 वर्षांपूर्वी घडलेली ही घटना आज घडल्यासारखी कशी वाटते? हे घडवून आणणारे मुख्य घटक कोणते आहेत, वधस्तंभ आणि त्याबद्दलचा तुमचा वैयक्तिक अनुभव का महत्त्वाचा आहे? चला आपण वधस्तंभाचे परीक्षण करू आणि पाहू.

# त्याला वधस्तंभी खिळा!

> “.. मनुष्याच्या पुत्राला मुख्य याजकांच्या व शास्त्र्यांच्या हाती धरून देण्यात येईल; ते त्याला मरणदंड ठरवतील, आणि थट्टा करण्यास, फटके मारण्यास व वधस्तंभावर खिळण्यास त्याला परराष्ट्रीयांच्या स्वाधीन करतील; मत्तय *20:18–19*

इस्राएलाच्या नेत्यांनी येशूचा इतका द्‌वेष का केला? त्याचा नाश करण्याचा त्यांचा हेतू का होता? ज्या मनुष्याने जगात इतका आनंद आणला तो लोकांसाठी धोकादायक कसा असू शकतो?

> जो खरा प्रकाश प्रत्येक मनुष्याला प्रकाशित करतो तो जगात येणार होता. तो जगात होता व जग त्याच्या द्‌वारे झाले, तरी जगाने त्याला ओळखले नाही. जे त्याचे स्वतःचे त्याकडे तो आला तरी त्याच्या स्वकीयांनी त्याचा स्वीकार केला नाही. योहान *1:9–11*

हे नेते त्यांच्या नैसर्गिक स्थितीत संपूर्ण मानवजातीचे प्रतिनिधी होते आणि त्यांची वृत्ती देखील पित्याच्या अभिषिक्त पुत्राप्रती तशीच होती.

> कारण तो त्याच्यापुढे रोपासारखा, रुक्ष भूमीतील अंकुरासारखा वाढला; त्याला रूप नव्हते, त्याला शोभा नव्हती, त्याच्याकडे पाहिले तर त्याच्यावर मन बसेल असे त्याच्या ठायी सौंदर्य नव्हते. तुच्छ मानलेला, मनुष्यांनी टाकलेला, क्लेशांनी व्यापलेला व व्याधींशी परिचित असलेला असा तो पुरुष पाहून लोक तोंडे फिरवत व त्याला तुच्छ लेखत; आणि त्याला आम्ही मानले नाही. यशया *53:2–3*

> परमेश्वराविरुद्ध व त्याच्या अभिषिक्ताविरुद्ध पृथ्वीवरील राजे उठले आहेत, सत्ताधीश एकत्र जमून मसलत करीत आहेत की, "चला, आपण त्यांची बंधने तोडून टाकू, आपणांवरील त्यांचे पाश फेकून देऊ." स्तोत्रसंहिता *2:2–3*

वधस्तंभाची कथा हा मानवी इतिहासातील सर्वात स्पष्ट क्षण आहे जो आदामाकडून मिळालेल्या आपल्या नैसर्गिक वारशामध्ये देवाच्या पुत्राप्रती आपली सामूहिक वृत्ती प्रकट करतो. या कथेने पौलाचे विधान खरे ठरवले जेव्हा त्याने म्हटले:

> कारण देहस्वभावाचे चिंतन हे देवाबरोबर वैर आहे; ते देवाच्या नियमशास्त्राच्या अधीन नाही, आणि त्याला तसे होता येत नाही. रोमकरांस *8:7*

हे वैर कुठून आले? अगदी सुरुवातीला, देवाने आदाम आणि हव्वेला प्रेमळपणे सूचना दिली होती की बागेच्या मध्यभागी एक झाड आहे ज्यातून त्यांनी खाऊ नये. या झाडाचे फळ खाल्ल्याने त्यांचा मृत्यू होईल आणि त्यांचे अस्तित्व नाहीसे होईल. आदाम आणि हव्वा यांना त्यांच्या निर्माणकर्त्याची सेवा करण्याची निवड करण्याची संधी देण्यासाठी हे झाड बागेत ठेवण्यात आले होते. बागेत अस्तित्वात असलेल्या ह्या तत्त्वाशिवाय त्यांना निवड करण्याची क्षमता नसती. तरीही देवाविरूद्ध निवड करणे म्हणजे जीवनाच्या स्त्रोतापासून वेगळे होणे होय.

देवाचे शब्द आपण कसे समजले पाहिजेत? आदाम आणि हव्वा यांच्या आरोग्यासाठी त्यांना असीम प्रेम आणि काळजी देण्यात आली होती काय? सर्पाच्या माध्यमातून प्रहार करण्याची संधी साधून सैतान हव्वेला देवाने असे का म्हटले याचा वेगळाच हेतू सुचवूतो.

> सर्प स्त्रीला म्हणाला, "तुम्ही खरोखर मरणार नाही; कारण देवाला हे ठाऊक आहे की तुम्ही त्याचे फळ खाल त्याच दिवशी तुमचे डोळे उघडतील. आणि तुम्ही देवासारखे बरेवाईट जाणणारे व्हाल." उत्पत्ती *3:4–5*

सैतानाने देव स्वार्थी आहे आणि आदाम आणि हव्वा यांना त्यांच्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करत आहे असे दर्शवले. देवाच्या शब्दांवर हा हेतू ठेवल्याने देवाने बोललेल्या शब्दांचा अर्थ पूर्णपणे बदलला. सैतानाने उलट तर्क वापरून आपले म्हणणे मांडले. "तुम्ही खरोखर

मरणार नाही." यावरून असे सूचित होते की देवच त्यांना मारील आणि त्यांच्या पूर्ण क्षमतेवर मर्यादा घालण्याचा त्याचा स्वार्थी हेतूची तो खात्री करेल. याचा अर्थ आदाम आणि हव्वा यांना असा समजला की ते देवाकडून मरण्यापेक्षा स्वतः मेले पाहिजेत. दुसऱ्या शब्दांत, त्यांच्या लक्षात आले की देव त्यांना त्यांच्या पापांद्वारे स्वतःचा नाश होऊ देण्यापेक्षा त्यांना स्वतः मारून टाकेल. ह्यात खूप जास्त फरक आहे.

देव आपल्या पत्नीला तिच्या अपराधाबद्दल ठार मारणार आहे असे समजत असताना आदामाने फळ घेतले आणि खाल्ले. देव एक जुलमी आहे या खोट्या कल्पनेनुसार, आदामाने द्वेष आणि बंडखोरीच्या भावनेने देवाचा अवमान करण्याचा आणि तिच्यासोबत जे काही घडले पाहिजे त्यात हव्वेसोबत उभे राहण्याचा निर्धार केला. त्याच वेळी, आदामाला आश्चर्य वाटले की सर्पाचे शब्द

देव आपल्या पत्नीला तिच्या अपराधाबद्दल ठार मारणार आहे असे समजत असताना आदामाने फळ घेतले आणि खाल्ले. देव जुलमी आहे या खोट्या कल्पनेनुसार, आदामाने द्वेष आणि बंडखोरीच्या भावनेने देवाचा अवमान करण्याचा निर्धार केला.



खरे आहेत कि नाही आणि यामुळे त्याला फळ घेण्यास आणि देवाविरुद्ध सर्पात सामील होण्यास प्रोत्साहित मिळाले.

येथे देवाप्रती माणसाच्या द्वेषाचे मूळ आपल्याला आढळते. आदामाच्या मनात देवाच्या चारित्र्याची चुकीची धारणा होती आणि त्याने त्या चुकीच्या चारित्र्यावर कृती केली. इतरांना मारून देव स्वतःच्या हिताचे रक्षण करील या विश्वासाने, आदामाने स्वतःच्या चरित्राचे हे वैशिष्ट्य प्रकट केले जेव्हा त्याला त्याच्या जिवाची भीती वाटत होती.

> तो म्हणाला, *"मी बागेत तुझा आवाज ऐकला, तेव्हा मी नग्न आहे म्हणून भिऊन लपलो."* देवाने म्हटले, *"तू नग्न आहेस हे तुला कोणी सांगितले? ज्या झाडाचे फळ तू खाऊ नकोस अशी मी तुला आज्ञा केली होती त्याचे फळ तू खाल्लेस काय?"* आदाम म्हणाला, *"जी स्त्री तू मला सोबतीला दिलीस तिने त्या झाडाचे फळ मला दिले आणि ते मी खाल्ले."* उत्पत्ती *3:10–12*

आदामाला भीती वाटली कारण देव त्याला मारण्यासाठी आला आहे अशी खोटी समजूत त्याच्या मनात होती. ज्या झाडाचे फळ त्याने खाऊ नये अशी त्याला आज्ञा देण्यात आली होती त्या झाडाचे फळ त्याने खाल्ले आहे काय असे विचारले असता त्याने दोष आपल्या पत्नीवर आणि देवावर टाकला. थोडक्यात, आदाम म्हणत होता, "जर कोणाला मरायचे असेल तर तू माझ्या पत्नीला घेऊन तिला मारून टाकावे आणि तुलाही जिवे मारले पाहिजे कारण तू तिला बनवलेस!"

हा विश्वास ह्या खोट्या कल्पनेवर आधारित आहे की देव स्वतःच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कोणालाही मारेल. एखाद्याला मृत्यूदंड देण्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही हे आदामाच्या लक्षात आल्याने, तो त्याच्या हिताचे रक्षण करण्यासाठी त्याच्या पत्नीला आणि देवाला मृत्यूदंड देतो. आम्ही स्वारस्याने लक्षात ठेवतो की पतनानंतर मनुष्याशी सर्व संवाद देवाच्या पुत्राद्वारे झाला जो देव आणि मनुष्य यांच्यातील एक माध्यस्थ आहे (1 तीमथ्य 2:5). अशाप्रकारे, आदामाने देवाच्या पुत्राला देवाच्या आज्ञेचे उल्लंघन करण्यास प्रवृत्त करणारी स्त्री बनवल्याबद्दल मृत्यूदंडाची शिक्षा दिली. या शब्दांत, “ज्या स्त्रीला तू माझ्याबरोबर राहायला दिलेस” त्यामध्ये 4000 वर्षांनंतर उद्रेक होणाऱ्या “त्याला वधस्तंभावर खिळा” या आक्रोशाचे बीज आहे.

हे बीज आदामाच्या हृदयात खोलवर रुजले होते आणि ही वास्तविकता त्याच्या स्वतःपासूनही लपलेली होती. जर देवाच्या पुत्राने आदामावर त्याला ठार मारण्याची योजना आखल्याचा आरोप केला असता, तर आदामाने त्याच्या वंशजांप्रमाणेच प्रतिक्रिया दिली असती.

> *“तुम्ही मला जिवे मारायला का पाहता?”* लोकसमुदायाने उत्तर दिले*,* *“तुला भूत लागले आहे; तुला जिवे मारायला कोण पाहतो?”* योहान *7:19, 20*

किरकोळ मुद्द्याला जास्त प्रतिसाद म्हणून आदामाने हा आरोप ठामपणे नाकारला असता. मृत्यूचे हे बीज काढून टाकण्याचा एकमेव मार्ग म्हणजे ते प्रकट होणे आणि नंतर आदामाने देवाच्या पुत्राप्रती त्याच्या वाईटाबद्दल पश्चात्ताप करणे.

मृत्यूचे हे बीज प्रत्येक स्त्री-पुरुषाचा वारसा आहे. सूक्ष्मपणे आणि अजाणपणे, आपल्यामध्ये देवाप्रती ही नैसर्गिक बंडखोरी आणि त्याच्या पुत्राला मारण्याची इच्छा आहे. म्हणूनच 2000 वर्षांपूर्वी ज्यांनी त्याला शारीरिकरित्या वधस्तंभावर खिळले त्यांच्याकडूनच नाही तर प्रत्येक मनुष्याकडून त्याचा तिरस्कार व त्याला नाकारले जाते.

याचे परिणाम दूरगामी आहेत आणि म्हणूनच वधस्तंभाचे तत्त्व मानवी इतिहासातील एका दिवसापुरते मर्यादित नाही तर मानवी इतिहासाच्या प्रत्येक दिवसापर्यंत त्याचा विस्तार होतो.

# त्यांच्या सर्व दुःखाने तो दुःखी झाला

> ‘ज्या कोणाची’ नावे जगाच्या स्थापनेपासून ‘वधलेल्या कोकऱ्याजवळील जीवनाच्या पुस्तकात लिहिलेली’ नाहीत असे पृथ्वीवर राहणारे सर्व जण त्या श्वापदाला नमन करतील. प्रकटीकरण *13:8*

येशूने वधस्तंभाबद्दल बोलताना ते बर्याच लोकांना समजण्यापेक्षा त्याने ते अधिक व्यापक पद्धतीने त्यांना सांगितले.

> मग येशू आपल्या शिष्यांना म्हणाला, “माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वतःस नाकारावे व आपला वधस्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावे. मत्तय *16:24*

वधस्तंभाचे एक तत्त्व आत्म-नकार आहे. येशूने हे त्याच्या वधस्तंभावर जाण्यापर्यंतच्या घटनांमध्ये दाखवून दिले. त्याला मिळालेल्या थट्टा आणि मारहाणीपासून त्याने स्वतःचा बचाव केला नाही. त्यामुळे त्याला अपार त्रास सहन करावा लागला तरीही त्याने धीराने ते सहन केले. विश्वाची सर्व शक्ती त्याच्या आज्ञेत होती. कदाचित एका झटक्यात त्याने स्वतःचे दुःख संपवले असते परंतु त्याच्या हल्लेखोरांना त्याच्याबद्दलचे त्यांचे मत बदलण्यासाठी शक्य तितका वेळ देण्यासाठी स्वतःला त्यांच्या अधीन केले. चाळीस वर्षांनंतर यरुशलेमेच्या नाशात स्वतःचा नाश होण्याआधी ते त्यांच्या कृत्यांचा पश्चात्ताप करतील अशी ख्रिस्ताला आशा होती.

वस्तुस्थिती अशी आहे की विश्वात सर्व काही देवाच्या पुत्राद्वारे एकत्र ठेवलेले आहे.

> तो सर्वांच्या पूर्वीचा आहे व त्याच्यामध्ये सर्वकाही अस्तित्वात आहे. कलस्सै *1:17*

> हा त्याच्या गौरवाचे तेज व त्याच्या तत्त्वाचे प्रतिरूप असून आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने विश्वाधार आहे, आणि *[*स्वतः आमच्या*]* पापांची शुद्धी केल्यावर तो उर्ध्वलोकी राजवैभवाच्या 'उजवीकडे बसला.' इब्रीलोकांस *1:3*

ज्याने आपल्याला घडवले त्याप्रमाणे, ख्रिस्त एक कोमल पालक आहे जो प्रत्येक पुरुष, स्त्री आणि मुलासाठी तळमळतो. त्याच्या प्रत्येक मुलाने आनंदी, निरोगी आणि शांत वातावरणात वाढावे अशी त्याची इच्छा आहे. त्याची इच्छा ही त्याच्या पित्याचे प्रतिरूप आहे, जो सर्व गोष्टींचा उगम आहे. याचा अर्थ प्रत्येक वेळी जेव्हा त्याच्या मुलांना वेदना होतात तेव्हा ख्रिस्ताला वेदना होतात. मानवतेच्या सर्व दुःखांसाठी त्याचे हृदय दुखते. यशया संदेष्ट्याने या वचनाबद्दल असे सांगितले:

> त्यांच्या सर्व दु:खाने तो दु:खी झाला, त्याची प्रत्यक्षता दर्शवणाऱ्या दिव्यदूताने त्यांचे तारण केले; त्याने आपल्या प्रीतीने व आपल्या करुणेने त्यांना उद्धरले; पूर्वीचे सर्व दिवस त्याने त्यांचे लालनपालन केले. यशया *63:9*

एक राष्ट्र आणि व्यक्ती या नात्याने इस्राएलाने जे काही सहन केले ते ख्रिस्ताने सहन केले. तथापि, त्याचे दुःखसहन केवळ इस्राएलासाठी नव्हते तर पृथ्वीवरील प्रत्येक मनुष्यासाठी होते.

- तुमच्यापैकी ज्यांना मुले आहेत त्यांनी विचार करावे की, तुमच्या लेकरांना खूप वेदना होत असताना तुम्हाला कसे वाटते? ते तुमच्या हृदयाला छेदते आणि खूप दुःख देते की नाही. जर तुमच्या मुलांपैकी एकाने दुसऱ्याला जखमी केले तर? यामुळे तुम्हाला आणखी दुःख होते. जखमी झालेल्या तुमच्या मुलासाठी तुम्हाला त्रास होतो आणि ज्याने ती जखम दिली आहे त्याच्याबद्दल निराशा वाटते.

कुटुंबाबाहेरील कोणीतरी व्यक्ती आपल्या मुलाचे नुकसान करते तेव्हा पालकांना कसे वाटते? त्या व्यक्तीला शिक्षा करणे ही अनेकांची नैसर्गिक भावना असते. येशूच्या मुलीवर बलात्कार होतो तेव्हा त्याला कसे वाटते? मानवी पालकांना

त्यांच्या लेकरांबद्दल जितके दुःख वाटते त्यापेक्षा अधिक दुःख त्याला होते. गुन्हेगाराला सामोरे जाण्यासाठी मानवी प्रतिसाद म्हणजे त्यांना शिक्षा करणे. ख्रिस्तासाठी, अपराधी देखील त्याचे मूल आहे. त्यांच्या दुष्ट कृत्याने तो जखमी झाला आहे पण जर त्याने त्यांच्यापासून संरक्षण काढून घेतले तर ते मरतील आणि कोणीही मरण पावू नये अशी त्याची इच्छा आहे. म्हणून, पुरुष, स्त्रिया आणि त्याची लेकरे जेव्हा एकमेकांना दुखवतात, अत्याचार आणि खून करतात तेव्हा ख्रिस्त शांतपणे ते सहन करतो.

आपल्याद्वारे होणारे प्रत्येक पाप म्हणजे ख्रिस्ताच्या आत्म्याला आपल्या मार्गदर्शनासाठी नकार देत होय. प्रत्येक वेळी जेव्हा आपण पाप करतो तेव्हा आपण ख्रिस्ताला दुखावतो.

> ते जर पतित झाले तर त्यांना पश्चात्ताप होईल असे त्यांचे पुन्हा नवीकरण करणे अशक्य आहे*;* कारण ते देवाच्या पुत्राला स्वतःपुरते नव्याने वधस्तंभावर खिळतात व त्याचा उघड अपमान करतात*.* इब्रीलोकांस *6:6*

प्रत्येक वेळी जेव्हा एखादी व्यक्ती आपल्या जोडीदाराला चापट मारते तेव्हा ख्रिस्ताला ते जाणवते. प्रत्येक वेळी जेव्हा एखादे मूल कोपऱ्यात थरथर कापत असताना त्यांचे वडील आईला मारत असतात तेव्हा ख्रिस्ताला हे सर्व जाणवते. परंतु तो लोकांना या गोष्टी करण्यापासून थांबवण्यास भाग पाडू शकत नाही कारण बळाचा वापर वाईट करणाऱ्यांचे चरित्र बदलत नाही. तथापि, देवाने बळाचा वापर केल्यास त्याचे चरित्र नक्कीच बदलेल. पण पवित्र शास्त्र सांगते की, देव बदलत नाही (मलाखी 3:6). हे देखील विचारात घ्या की जर एखाद्या व्यक्तीला हे समजले की देव त्यांच्यावर जबरदस्ती करत आहे, तर ते त्याला प्रतिकार करून वाईट करण्याचा आणखी दृढनिश्चय करतील.

मनुष्याने एकमेकांना दिलेल्या वेदनांमुळे ख्रिस्ताला होणारे दुःख जेव्हा आपण समजतो तेव्हा आपल्याला वधस्तंभाचा एक दृष्टीकोन प्राप्त होतो जो इतका तेजस्वी आहे की या जाणिवेप्रमाणे जगणे अशक्य होते. worldometers.info मधील खालील आकडेवारीचा विचार करा:

WHO (वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन) नुसार, जगात दरवर्षी अंदाजे 40-50 दशलक्ष गर्भपात होतात. हे दररोज अंदाजे 125,000 गर्भपातांशी संबंधित आहे. ख्रिस्ताची 125,000 मुले दररोज अश्या प्रकारे मरण पावतात म्हणून ख्रिस्त किती दुःख सहन करतो ह्याची आपण कल्पना करू शकतो काय? जेव्हा आई तिची गर्भधारणा संपुष्टात आणण्याचा प्रयत्न करते तेव्हा तिच्या भावनांबद्दल काय? यामध्ये असलेले दुःख समजून घेण्याचा मानवी मनाला कोणताही मार्ग नाही.

आज अंदाजे 3000 लोक चारचाकी अपघातात मरतील आणि 2800 लोक स्वतःचा जीव घेतील. या आकडेवारीत केवळ मरण पावलेल्यांसाठीच नाही तर मागे राहिलेल्यांसाठी किती दुःख आहे? आज किती स्त्रिया आणि लेकरांवर पुरुषांकडून लैंगिक अत्याचार होत असतील? आकडेवारी दर्शवते की जवळपास 25 दशलक्ष लोकांची गुलाम म्हणून तस्करी केली जात आहे आणि यापैकी निम्म्यालेकरांवर हून अधिक लोकांचे लैंगिक शोषण केले जात आहे. 25 दशलक्षांपैकी 71% महिला आणि मुली आहेत.

worldometers.info/abortions/

आज जगभरात कुठेतरी 137 स्त्रिया त्यांच्या जोडीदाराच्या किंवा पूर्वीच्या जोडीदाराच्या हातून मरण पावतील. या आकडेवारीत ख्रिस्ताला भोगाव्या लागलेल्या यातना अथांग आहेत. ही फक्त काही आकडेवारी आहेत जी जगभरातील मानवी दु:खाला दररोज प्रतिबिंबित करतात.

दररोज, ख्रिस्ताला पुरुष आणि स्त्रियांची हिंसा आणि स्वार्थ सहन करण्यास भाग पाडले जाते. कोणीही असा प्रश्न उपस्थित करू शकतो की, "ख्रिस्त स्वतःला का वाचवत नाही आणि या आत्मत्यागाच्या वधस्तंभातून खाली का येत नाही?" प्रत्येक दिवस त्याच्यासाठी आणि त्याच्या प्रिय देवदूतांसाठी एक जिवंत नरक आहे जे आपल्या संरक्षणासाठी पाठवले जातात आणि त्यांना ह्या अत्याचारांचे साक्षीदार देखील व्हावे लागते. तुम्ही कधी देवदूत व्हावे अशी तुमची इच्छा आहे काय? या जगातील पतित पुत्र आणि मुलींची काळजी घेताना त्यांना किती दु:ख सहन करावे लागेल याचा नीट विचार करा. ते काम तुम्ही स्वेच्छेने कराल काय; एखाद्या मुलावर अत्याचार होताना पाहणे कारण त्यांना मदत करण्यास कोणीही येशूकडे विचारत नाही किंवा ते त्यांना पाठवलेल्या प्रकाशापासून त्यांचे मन दूर करत आहेत? असे दृश्य पाहणाऱ्या त्या देवदूताला किती असहाय्य दु:ख वाटत असेल?

एखाद्या पालकाच्या परिस्थितीची कल्पना करा ज्याची व्यसनी मुलगी एका अत्याचारी पतीसोबतच्या हिंसक नातेसंबंधात आहे. तुम्ही ते कसे थांबवताल? तुम्ही तुमच्या मुलीला बदलायला भाग पाडाल काय? एक चुटकी वाजवून तुम्ही सर्व वेदना दूर करू शकता काय? जर तुमच्या मुलीने मदत करण्यास नकार दिला तर तुम्ही तिच्यात बदल करू शकता काय? तिच्या संमतीशिवाय, तुम्ही फक्त तुमचे प्रेम तिच्यावर व्यक्त करून आणि ती तिच्या आव्हानांना तोंड देत असताना तिला सांत्वन देऊन तिच्यासोबत चालू  शकता. तिला बदलण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न करणे म्हणजे तिला अजून समस्येत खोलवर नेणे होय.

आपला पिता आणि तारणारा अश्याच परिस्थितीत आहे. जरी त्यांच्याकडे अमर्याद संसाधने आहेत, तरीही ते त्यांच्या मुलांच्या इच्छेवर जबरदस्ती करू

शकत नाहीत आणि आम्ही त्यांची मदत मागितल्याशिवाय आणि त्यांचे मार्गदर्शन ऐकल्याशिवाय आणि त्यांच्या मार्गदर्शनाचे पालन केल्याशिवाय ते आम्हाला बदलू शकत नाहीत.

मानवी मनाला, या वधस्तंभावर विश्वास ठेवणे अशक्य वाटते कारण ते आपल्या विचार करण्याच्या पद्धतीपेक्षा खूप वेगळे आहे. हे स्वसंरक्षण, किंवा स्वार्थ नाही. तुमच्या मुलांच्या सेवेसाठी, सोईसाठी आणि मदतीसाठी ज्यापैकी बहुतेकांना तुमच्याशी काहीही करायचे नाही अश्या सर्वांसाठी स्वतःला पूर्णपणे देऊन टाकणे असे आहे.

असे बरेच लोक आहेत जे देवावर रागावलेले आहेत कारण तो त्यांच्या दुःखाची काळजी घेत नाही असे त्यांना दिसते. जर लोकांनी देव आणि त्याच्या आज्ञा नाकारल्या, तर तो सैतानाला त्यांचे नुकसान करण्यापासून कसे रोखू शकतो जेव्हा की ते स्वतःच देवाची आज्ञा मोडून सैतानाला त्यांचे जीवन उद्ध्वस्त करू देतात?

आपल्यापैकी जे देवावर विश्वास ठेवतात आणि त्याच्या मार्गांचे अनुसरण करण्याचा प्रयत्न करतात त्यांच्यासाठी, आपण पाहू शकतो की ख्रिस्ताचा वधस्तंभ ही एक दिवसाची घटना नाही तर संपूर्ण मानवी इतिहास व्यापणारा अनुभव आहे? ख्रिस्त देहात एकदाच मरण पावला हे खरे आहे, परंतु ही घटना आपल्यासाठी सत्य उघडण्याची गुरुकिल्ली आहे की ख्रिस्ताला मानवी विचार, शब्द आणि कृतींनी दररोज छेद दिला जात आहे. पवित्र शास्त्रामधील ह्या पुढील वचनांचा विचार करा:

> मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे*;* आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही*,* तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो*;* आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे*;* त्याने माझ्यावर प्रीती केली व स्वत*:*ला माझ्याकरता दिले*.* गलतीकरांस *2:20*

“मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे” पौल असे का म्हणतो? तो “मी ख्रिस्तासारखा वधस्तंभावर खिळला आहे” असे का म्हणत नाही? जर मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे, असे सूचित करते की ख्रिस्त आजही मनुष्यांच्या पापामुळे वधस्तंभावर खिळलेला आहे.

> आमचा पाठलाग झाला तरी परित्याग करण्यात आला नाही*;* आम्ही खाली पडलेले आहोत तरी आमचा नाश झाला नाही*;* आम्ही प्रभू येशूचा वध सर्वदा शरीरात वागवतो*,* अशा हेतूने की*,* येशूचे जीवनही आमच्या शरीरांत प्रकट व्हावे*.* 2 करिंथकरांस *4:9–10*

प्रभू येशूचा मृत्यू आपल्या शरीरात वागवण्याविषयी पौल का बोलतो? हे भूतकाळात नव्हे तर वर्तमानकाळात लिहिले जाते. जे ख्रिस्ताला अनुसरतात त्यांच्या छळांतून व दु:खांतून, ख्रिस्त त्यांच्याबरोबर दु:ख सहन करतो आणि त्यांच्या दु:खाने व वेदनांनी त्यांना स्पर्श केला आहे, हे यातून दिसून येत नाही काय?

मग या वधस्तंभाला मानवी प्रतिसाद काय आहे? जर तुम्ही दररोज त्याच्या दुःखाचा विचार केला तर स्वतःसाठी जगणे अशक्य आहे. ख्रिस्त दररोज संपूर्ण यातना भोगत आहे हे जाणून तुम्ही स्वतःला संतुष्ट करण्यासाठी कसे जगू शकता?

एक दिवशी मी ह्या विषयावर मनन करत असताना त्याच्या दुःखाने पूर्णपणे भारावून गेलो, मी त्याला प्रार्थनेत विचारले, "या गोष्टींमध्ये मी तुझ्यासाठी आशीर्वाद कसा बनू शकतो आणि तुला कशी मदत करू शकतो?" त्याने उत्तर दिले "तू माझ्यासोबत हे एक तास पाहू शकतो काय?" प्रिय वाचक, मी तुम्हाला आमच्या तारणकर्त्याच्या दुःखांवर विचार करण्यासाठी आमंत्रित करत आहे. तुम्हाला जीवनातील ज्या ऐहिक सुखांची इच्छा आहे ती ख्रिस्त सहन करत असलेल्या दु:खाच्या लायकीचे आहे का? प्रत्येक क्षणी ह्या जगाच्या सध्याच्या स्थितीत ख्रिस्त अगणित यातना सहन करतो. तुम्ही घेत असलेला प्रत्येक श्वास मौल्यवान आहे कारण दुःखामुळे देवाच्या पुत्राला किंमत मोजावी लागली. त्याचे सदैव दयाळू अंतःकरण माणसांना बदलण्यास भाग पाडणार नाही, परंतु आपण त्याच्याकडे यावे यासाठी तो उत्कट इच्छेने वाट पाहतो जेणेकरून आपल्याला विश्रांती मिळेल.

देव आपल्याला जगातील सर्व दुःखांसाठी जबाबदार बनवत नाही आणि आपण त्याच्यासाठी संपूर्ण जग स्वतःहून बदलू शकत नाही. ख्रिस्ताच्या आत्मत्याग आणि त्याचे प्रेम आणि संयम यावर दररोज चिंतन करून, आपण इतरांसाठी संयम आणि प्रेम विकसित करू शकतो, ज्यामुळे आपल्याला तक्रार किंवा चिडचिड न करता त्यांचे दोष स्वीकारण्याची परवानगी मिळते.

अनंतकाळचे अखंड युग, गेल्या सहा हजार वर्षांत वधस्तंभाच्या दुःखाची व्याप्ती कधीही पूर्णपणे प्रकट करणार नाही. ते निःस्वार्थीपणा दाखवून आपले स्वार्थी स्वभाव पूर्णपणे उघड करते. अशा प्रकारे वधस्तंभाचा विचार केल्याने आपण एकतर नम्र होऊ शकतो किंवा देवाच्या प्रेमाच्या गहन प्रकटीकरणाविरुद्ध कठोर होऊ शकतो.

वधस्तंभाच्या या प्रकटीकरणात तुम्ही स्वतःला देवाच्या प्रेमाकडे आकर्षित होऊ द्याल काय आणि जगाच्या स्थापनेपासून आतापर्यंत ख्रिस्ताला त्याच्या आत्म्यात मारले गेले आहे हे लक्षात घ्याल काय? जर ह्या भौतिक वधस्तंभाचे

प्रकटीकरण झाले नसते, तर आम्हाला ख्रिस्ताबद्दलच्या आमच्या खऱ्या नैसर्गिक भावना कळल्या नसत्या. 2000 वर्षांपूर्वी ख्रिस्ताच्या मृत्यूमध्ये, आदामामधील शत्रुत्वाचे बीज पूर्णपणे प्रकट झाले आणि आदामाच्या अंतःकरणात जे काही अविकसित आणि न समजलेले होते त्याचे संपूर्ण परिणाम मानवतेने पाहिले.

मग वधस्तंभाबद्दल जाणून घेतल्यास, आपण कसा प्रतिसाद दिला पाहिजे?

# तुम्ही माझ्याबरोबर एखादा तासही पाहू शकत नाही काय?

ख्रिस्ताच्या वधस्तंभाची कथा अशा प्रत्येकासाठी सामना करणारी आहे जो अजूनही स्वतःमध्ये माणुसकीची भावना टिकवून ठेवतो. जे प्राणी किंवा माणसे मारण्याचे अंतःकरण बनवतात ते सहसा धोकादायक पातळीपर्यंत संवेदनशीलता गमावतात.

जेव्हा शिष्यांनी त्यांच्या मशीहाला लोकांसमोर उभे राहताना आणि देवाच्या राज्याबद्दल सामर्थ्याने आणि खात्रीने बोलताना पाहिले, तेव्हा त्यांना त्याच्याशी संबंधित असल्याचा अभिमान वाटला. परंतु जेव्हा त्याने आपला वधस्तंभ कालवरीच्या मार्गावर नेला तेव्हा ही एक वेगळी कथा होती. वधस्तंभाचा अपमान आणि मृत्यू ही अशी गोष्ट आहे ज्याशी संबंधित असणे मानवी स्वभावाला आवडत नाही. हे पेत्राच्या जीवनात खालीलप्रमाणे प्रकट झाले:

> तेव्हापासून येशू आपल्या शिष्यांना सांगू लागला की, "मी यरुशलेमेस जाऊन वडील, मुख्य याजक व शास्त्री ह्यांच्याकडून पुष्कळ दुःखे सोसावी, जिवे मारले जावे व तिसऱ्या दिवशी उठवले जावे ह्याचे अगत्य आहे." तेव्हा पेत्र त्याला जवळ घेऊन त्याचा निषेध करून म्हणाला, "प्रभूजी, आपणावर दया असो, असे आपल्याला होणारच नाही." मत्तय *16:21–22*

येशूने वधस्तंभाबद्दल बोलावे अशी पेत्राची ईच्छा नव्हती, येशूने एकटा त्या प्रक्रियेतून जावे असे त्याला वाटले. येशूला फटके मारले जात असताना, पेत्राला

त्याच्या अनुयायांपैकी एक म्हणून कोपऱ्यात टाकले, परंतु त्याने ते नाकारले.

> मग तो बाहेर देवडीवर गेल्यावर दुसरीने त्याला पाहून तेथील लोकांना म्हटले, “हा नासोरी येशूबरोबर होता.” पुन्हा तो शपथ वाहून नाकारून म्हणाला, “मी त्या मनुष्याला ओळखत नाही.” मत्तय *26:71–72*

ख्रिस्ताच्या व्यथा आणि दुःखाची वास्तविकता स्वीकारणे म्हणजे त्याच्याबरोबर चालण्यासाठी स्वतःला पूर्णपणे त्याच्या स्वाधीन देणे आणि इतरांच्या काळजीत त्याच्या दुःखांच्या सहवासात येणे. प्रेषित पौलाने ही वास्तविकता समजून घेतली जेव्हा त्याने असे म्हटले:

> इतकेच नाही, तर ख्रिस्त येशू माझा प्रभू, ह्याच्याविषयीच्या ज्ञानाच्या श्रेष्ठत्वामुळे मी सर्वकाही हानी असे समजतो; त्याच्यामुळे मी सर्व गोष्टींना मुकलो, आणि त्या केरकचरा अशा लेखतो; ह्यासाठी की, मला ख्रिस्त हा लाभ प्राप्त व्हावा, आणि मी त्याच्या ठायी आढळावे आणि माझे नीतिमत्त्व — माझे स्वतःचे नव्हे म्हणजे नियमशास्त्राच्या योगे प्राप्त होणारे नीतिमत्त्व नव्हे — तर ते ख्रिस्तावरील विश्वासाने प्राप्त होणारे नीतिमत्त्व असे असावे. हे अशासाठी आहे की, तो व त्याच्या पुनरुत्थानाचे सामर्थ्य व त्याच्या दुःखाची सहभागिता ह्यांची, त्याच्या मरणाला अनुरूप होऊन मी ओळख करून घ्यावी; फिलिप्पैकरांस *3:8–10*

ह्या दु:खापासून मुक्त जीवन जगण्यासाठी, आपण ते अस्तित्वात नाही असे ढोंग केले पाहिजे किंवा झोपेतून त्याकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जर तुम्हाला खूप उत्साह, आनंद आणि "मजेदार जीवन" मिळवायचे असेल तर तुम्ही वधस्तंभाबद्दल विसरले पाहिजे. जर तुम्हाला पुष्कळ मालमत्तेची मालकी मिळवायची असेल आणि श्रीमंत व्हायचे असेल, तर तुम्हाला वधस्तंभ विसरण्यासाठी कार्य करावे लागेल कारण वधस्तंभ या सर्व गोष्टी शून्यता आणि व्यर्थपणाच्या ठरवतो.

दहा कुमारींच्या दृष्टान्ताद्वारे येशूने आपल्या असह्य शिष्यांना त्यांच्या वेदनादायक अनुभवासाठी तयार करण्याचा प्रयत्न केला.

> तेव्हा स्वर्गाचे राज्य दहा कुमारींसारखे असेल; त्या आपले दिवे घेऊन वराला सामोऱ्या जाण्यास निघाल्या. त्यांत पाच मूर्ख होत्या व पाच शहाण्या होत्या. कारण मूर्ख कुमारींनी आपले दिवे घेतले; पण आपल्याबरोबर तेल घेतले नाही; शहाण्यांनी आपले दिवे घेतले व भांड्यांत तेलही घेतले. मग वराला विलंब लागला व त्या सर्वांना डुलक्या आल्या व झोप लागली. मत्तय *25:1–5*

याच्या काही काळानंतर, येशू आणि त्याच्या शिष्यांनी गुरुवारच्या संध्याकाळी वल्हांडण सण साजरा केला आणि नंतर प्रार्थना करण्यासाठी गेथसेमेनी बागेत गेले. ख्रिस्ताच्या आजूबाजूचे वातावरण खूप जड होते. त्याच्यावर खूप ओझं आहे हे शिष्यांना दिसत होते. तो पेत्र, याकोब, व योहानाला त्याच्याबरोबर प्रार्थना करण्यासाठी आणखी एकांत ठिकाणी घेऊन गेला.

> मग त्याने पेत्र व जब्दीचे दोघे मुलगे ह्यांना बरोबर घेतले आणि तो खिन्न व अति कष्टी होऊ लागला. तेव्हा त्याने त्यांना म्हटले, "'माझा जीव' मरणप्राय, 'अति खिन्न झाला आहे,' तुम्ही येथे थांबा व माझ्याबरोबर जागे राहा." मग तो थोडासा पुढे जाऊन पालथा पडला आणि त्याने अशी प्रार्थना केली : "हे माझ्या बापा, होईल तर हा प्याला माझ्यावरून टळून जावो; तथापि माझ्या इच्छेप्रमाणे नको तर तुझ्या इच्छेप्रमाणे होवो." मत्तय *26:37–39*

येशू खूप व्यथित होता हे शिष्यांना दिसत असले, तरी ते झोपी गेले! काही काळ वेदनेने प्रार्थना केल्यावर येशू आपल्या झोपलेल्या शिष्यांकडे त्यांना जागृत करण्यासाठी आला:

> मग तो शिष्यांकडे आला आणि ते झोपी गेले आहेत असे पाहून पेत्राला म्हणाला, "हे काय, तुमच्याने घटकाभरही माझ्याबरोबर जागवत नाही? तुम्ही परीक्षेत पडू नये म्हणून जागृत राहा व प्रार्थना करा; आत्मा उत्सुक आहे खरा, पण देह अशक्त आहे." मत्तय *26:40–41*

आत्मविश्वास असलेल्या पेत्राने आधी सूचित केले होते की तो येशूसाठी मरण्यास तयार आहे, परंतु जेव्हा येशू मोठ्या संकटाच्या भाराखाली मरत होता तेव्हा पेत्र  झोपी गेला. पेत्र असे का करेल?

मानवी स्वभावाला त्याच्या स्वार्थी महत्वाकांक्षा जिवंत ठेवण्यासाठी त्याने ख्रिस्ताच्या दु:खाकडे झोपले पाहिजे. जर आपण ख्रिस्ताचे दुःख समजून घेतले आणि त्याची काळजी घेतली तर आपण त्याच्या बलिदानात सामील होऊ आणि आपल्या सांसारिक इच्छांचा त्याग करू.

दररोज आम्हाला आमच्या स्वार्थी स्वभावातून बाहेर काढण्यासाठी येशूच्या बलिदानाचा विचार करण्यासाठी आमंत्रित केले जाते. जुन्या कराराच्या सेवांमध्ये सकाळ आणि संध्याकाळचे यज्ञ होते. सकाळचा यज्ञ सकाळी ९ च्या सुमारास तर सायंकाळचा यज्ञ दुपारी ३ च्या सुमारास झाला. या वेळा आपल्याला ख्रिस्ताच्या दु:खांवर विचार करण्याची आणि कृपा आणि धैर्यासाठी

प्रार्थना करण्याची संधी दिली जाते ज्याद्वारे आपण अशा गोष्टी न बोलून आणि अपराध न करून त्याला वेदना देणे थांबवू.

बलिदानांबद्दल आपण लवकरच अधिक बोलू, परंतु प्रथम आपण पाहू की ख्रिस्ताचे अनुयायी दिवसाच्या विशिष्ट वेळी प्रार्थना करण्यासाठी एकत्र येत राहिले आणि आपल्याला दानिएलामधील अर्थ समजू लागले की त्याग आणि अर्पण का थांबले आहे.

> पेत्र व योहान हे तिसऱ्या प्रहरी प्रार्थनेच्या वेळेस वरती मंदिरात जात होते*.*
> प्रेषितांची कृत्ये *3:1*

प्रार्थनेची वेळ ही संध्याकाळच्या बलिदानाच्या आसपासची वेळ होती, परंतु प्रेषित फक्त प्रार्थना करण्यासाठी आणि ख्रिस्ताच्या दुःखांवर विचार करण्यासाठी आणि केवळ त्याच्यासाठी जगण्याची कृपा मागण्यास प्रार्थना करायचे.

जर तुम्ही येशू ख्रिस्ताचे अनुयायी असाल, तर मी तुम्हाला दिवसातून दोनदा थांबण्याचे आमंत्रण देतो आणि आपला पिता आणि तारणारा जगभरातील त्यांच्या सर्व मुलांचे दुःख सहन करत असताना त्यांच्या अपार दुःखाचा विचार करण्यासाठी तुम्हांला आव्हान करतो. येशू आज आपल्याला विचारत आहे की "तुम्ही घटकाभर माझ्याबरोबर पहाल काय?"

# होम व पापाबद्दल अर्पण ह्यांत तुझी इच्छा नव्हती

वधस्तंभाचे खरे दुःखित महत्व चुकवण्याचे एक मुख्य कारण म्हणजे जुन्या करारातील बलिदान पद्धती.

> इस्राएलाच्या सर्व मंडळीला सांगा की, ह्या महिन्याच्या दहाव्या दिवशी तुम्ही आपापल्या वाडवडिलांच्या घराण्यांप्रमाणे एकेका घराण्यामागे एकेक कोकरू घ्यावे*;* आणि एक कोकरू खपायचे नाही इतकी थोडकी माणसे कोणाच्या घराण्यात असली तर त्याने व त्याच्या घराजवळच्या शेजाऱ्याने आपल्या घराण्यातील संख्येप्रमाणे कोकरू घ्यावे*;* प्रत्येकाच्या आहाराच्या मानाने एक कोकरू किती माणसांना पुरेल ह्याचा हिशोब करावा. कोकरू घ्यायचे ते निर्दोष असावे. तो एक वर्षाचा नर असावा*;* हा नर मेंढरांतला किंवा शेरडांतला, तुम्हांला वाटेल तो घ्यावा*;* ह्या महिन्याच्या चौदाव्या दिवसापर्यंत तो राखून ठेवावा*;* आणि संध्याकाळी इस्राएल मंडळीतील लोकांनी तो वधावा. ज्या घरात त्याचे मांस खायचे असेल त्या घराच्या दोन्ही दारबाह्यांना व चौकटीच्या कपाळपट्टीला त्याचे काही रक्त लावावे. निर्गम *12:3–7*

> माझ्यासाठी एक मातीची वेदी कर आणि तिच्यावर आपली शेरडेमेंढरे व गुरेढोरे ह्यांची होमार्पणे व शांत्यर्पणे कर, जेथे जेथे माझे नामस्मरण व्हावे असे मी करीन, तेथे तेथे मी तुझ्याकडे येऊन तुला आशीर्वाद देईन. निर्गम *20:24*

या वचनातून असा आभास मिळतो की, लोकांनी बलिदान देताना प्राण्यांना मारावे अशी देवाची इच्छा आहे आणि जेव्हा ते असे करतात तेव्हा तो त्यांना आशीर्वाद देईल. जेव्हा योहान बाप्तिस्मा मसीहाला जगासमोर सादर करतो तेव्हा तो त्याला देवाचा कोकरा म्हणून सादर करतो.

> दुसऱ्या दिवशी येशूला आपणाकडे येताना पाहून तो म्हणाला, "हा पाहा, जगाचे पाप हरण करणारा देवाचा कोकरा! योहान *1:29*

जर येशू हा देवाचा कोकरा आहे ज्याचे बलिदान दिले गेले पाहिजे, तर अनेक लोकांचा तार्किक निष्कर्ष असा आहे की आपल्या पापांची किंमत चुकवण्यासाठी देवाचा पुत्र मारला जावा अशी देवाची इच्छा होती. या उदाहरणामध्ये, मानवजात देवाच्या पुत्राची हत्या करत नाही तर देवाच्या इच्छेनुसार करत आहे.

> त्याला ठेचावे असे परमेश्वराच्या मर्जीस आले. त्याने त्याला पिडले; त्याच्या जिवाचे दोषार्पण झाल्यावर तो संतती पाहील, तो दीर्घायू होईल, त्याच्या हातून परमेश्वराचा मनोरथ सफल होईल. यशया *53:10*

जर देवाला त्याच्या पुत्राला वधस्तंभावर बलिदानात ठेचून मारण्यात आनंद झाला असेल, तर अनेकांचा असा समज आहे की देवाला आपल्या पापाविरुद्धचा राग पूर्ण करण्यासाठी या बलिदानाची गरज होती. तर्क असा आहे की देवाच्या न्यायाचे समाधान करणे आवश्यक आहे. आपली पापे किती वाईट आहेत हे दाखवण्यासाठी, पित्याच्या न्यायाचे समाधान करण्यासाठी येशूला आपली जागा मरणात घ्यावी लागली. एक अतिशय लोकप्रिय ख्रिस्ती गीत ही कल्पना खालीलप्रमाणे चित्रित करते:

एकट्या ख्रिस्तामध्ये, ज्याने
असहाय्य बाळामध्ये देवाची देह
पूर्णता धारण केली, ही प्रेमाची आणि
धार्मिकतेची देणगी ज्यांना
वाचवायला तो आला त्यांच्याकडून
तिरस्कारली गेली 'येशू मरण पावला
तेव्हा त्या वधस्तंभावर देवाचा क्रोध
तृप्त झाला कारण त्याच्यावरील
प्रत्येक पाप ठेवण्यात आले होते.
ख्रिस्ताच्या मृत्यूमध्ये मी जगतो, मी
जगतो

वधस्तंभाची ही कल्पना सर्व गोष्टींना पूर्णपणे बदलते. हे देवाला मृत्यूची मागणी करणारा म्हणून सादर करते आणि हे आपल्या स्वभावाविषयीचे सत्य आपल्यापासून लपवून ठेवते ज्याची आपण दुसऱ्या अध्यायात चर्चा केली आहे. जर देवाला आपल्या पापांमुळे त्याच्या पुत्राच्या मृत्यूची आवश्यकता असेल, तर त्याच्याबद्दलचा आपला नैसर्गिक द्वेष अस्पष्ट आहे. प्रथम, आपण असा तर्क करू शकतो की केवळ यहूदी आणि रोमन लोकांनी त्याला मारले. दुसरे म्हणजे, असे म्हणता येईल की यज्ञ पूर्ण व्हावे म्हणून देवाची इच्छा ते पूर्ण करत होते. या विचारसरणीतूनच पुढीलप्रमाणे कल्पना निर्माण होतात:

> हस्तलिखित, अनुवादित आणि प्रमाणित केलेल्या तज्ञांच्या मते, यहुदाची हरवलेली सुवार्ता असे म्हणते की येशूने त्याचा जवळचा मित्र यहूदा इस्करीयेत याला स्वतःला रोमी लोकांच्या ताब्यात देण्यास सांगितले कारण त्याला त्याच्या पृथ्वीवरील शारीरिक तुरुंगातून बाहेर पडायचे होते. *26* पृष्ठे *- 13* पत्रके पॅपिरसच्या पुढच्या आणि मागे दोन्ही बाजूने - यहूदा हा ख्रिस्ती नायक, खलनायक नाही.
>
> ह्या कागदपत्रांना काल वॉशिंग्टनमध्ये नॅशनल जिओग्राफिक सोसायटीने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत उघड केले, जी एकमेव असलेली प्रत जपवून ठेवण्याच्या आंतरराष्ट्रीय प्रयत्नांचा एक भाग होती. इजिप्शियन थडग्यातील चुनखडीच्या पेटीपासून न्यूयॉर्कमधील हिक्सविले येथील सेफ्टी डिपॉझिट बॉक्सपर्यंतच्या एका विचित्र प्रवासात ते खराब झाले होते.
>
> "यहूदाची सुवार्ता यहूदाच्या विश्वासघाताच्या कृतीला आज्ञाधारक कृतीत बदलते," क्रेग इव्हान्स म्हणाले, वुल्फविले, एन.एस. येथील अकाडिया डिव्हिनिटी कॉलेजमधील नवीन कराराच्या अभ्यासाचे प्राध्यापक, ज्यांनी दस्तऐवजाचा अर्थ लावण्यास मदत केली.

आपल्यापैकी जे लोक पवित्र शास्त्राला देवाचे वचन मानतात त्यांच्यासाठी अशी कल्पना सत्यापासून दूर आहे. तरीही प्रश्न कायम आहेत. देवाला या यज्ञांची गरज होती काय? त्याचा न्याय अशी मागणी करते काय?

> यज्ञपशू व अन्नार्पण ह्यांत तुला संतोष नाही; तू माझे कान उघडले आहेस; होम व पापाबद्दल अर्पण ही तू मागत नाहीस. स्तोत्रसंहिता *40:6*

पवित्र शास्त्र आपल्याला स्पष्टपणे सांगते की देवाला बलिदान नको होते. हे

देखील स्पष्टपणे सांगते की त्याला होमार्पण आणि पापार्पण आवश्यक नव्हते. या पुढे आम्ही वाचतो:

> तुमच्या पूर्वजांना मी मिसर देशातून बाहेर आणले त्या दिवशी होमबलींविषयी किंवा यज्ञबलींविषयी मी त्यांना काही सांगितले नाही व आज्ञा दिली नाही. तर मी त्यांना एवढीच आज्ञा केली की, 'माझे वचन ऐका, म्हणजे मी तुमचा देव होईन व तुम्ही माझे लोक व्हाल; तुमचे बरे व्हावे म्हणून जो सरळ मार्ग मी तुम्हांला सांगतो त्याने चाला.' यिर्मया *7:22–23*

देवाने वल्हांडण सण अर्पण करण्याची आज्ञा दिली आणि यज्ञपद्धतीची स्थापना केली हे स्पष्ट दिसत असताना होमार्पण आणि यज्ञ करण्याविषयी त्याने इस्राएल लोकांना आज्ञा दिली नाही, वचन असे कसे म्हणू शकते? येथे पवित्र शास्त्रत विरोधाभास आहे काय?

> "उद्या ह्या सुमारास मी तुझ्याकडे बन्यामिनी प्रांतातला एक मनुष्य पाठवीन, त्याला अभिषेक करून माझ्या इस्राएल लोकांवर अधिपती नेम; तो माझ्या लोकांना पलिष्ट्यांच्या हातून सोडवील; कारण माझ्या लोकांचे गाऱ्हाणे माझ्याकडे आले आहे म्हणून त्यांच्याकडे माझी नजर गेली आहे." शौल शमुवेलाच्या दृष्टीस पडला तेव्हा परमेश्वर त्याला म्हणाला**, "**ज्या पुरुषाविषयी मी तुला सांगितले होते तो हा**;** हाच माझ्या लोकांवर सत्ता चालवील**."** *1* शमुवेल *9:16–17*

या कथेत, देव त्याचा संदेष्टा शमुवेल ह्याद्वारे इस्राएली लोकांवर एका मनुष्याला राजा म्हणून अभिषेक करण्याची आज्ञा देत आहे. छोट्या संदर्भात असे दिसते की या गोष्टींची आज्ञा देणारा देवच आहे. पण मोठा संदर्भ असा आहे की इस्रायलला राजा हवा होता आणि देवाने त्यांची विनंती पूर्ण केली.

> "आमचा न्यायनिवाडा करायला आम्हांला एक राजा द्या," असे ते म्हणाले त्यामुळे शमुवेलास वाईट वाटले. मग शमुवेलाने परमेश्वराची प्रार्थना केली. तेव्हा परमेश्वर शमुवेलाला म्हणाला, "लोक जे तुला सांगत आहेत ते सगळे ऐक; कारण त्यात ते तुझा धिक्कार करत नाहीत, तर मी त्यांचा राजा नसावे म्हणून ते माझाच धिक्कार करत आहेत. मी त्यांना मिसर देशातून बाहेर आणले त्या दिवसापासून आजपर्यंत माझ्याशी त्यांनी असेच वर्तन केले आहे; त्यांनी मला सोडून अन्य देवांची उपासना केली; तसेच ते तुझ्याशी वर्तन करत आहेत. *1* शमुवेल *8:6–8*

पवित्र शास्त्र आपली पुष्टी करते की देवाला इस्राएलावर एक राजा द्यायची इच्छा नव्हती तरीही त्याने त्यांना परवानगी दिली.

> हे इस्राएला, जो मी तुझा साहाय्यकर्ता त्या माझ्यावर तू उलटलास, त्यामुळे तुझा नाश झाला. तुझ्या सर्व नगरांतून तुझा बचाव करणारा तुझा राजा कोठे गेला? ज्या तुझ्या शास्त्यांच्या बाबतीत तू म्हणावेस की, "मला राजा व अधिपती असावेत," ते कोठे गेले? मी तुझ्यावर कोपून तुला राजा दिला व तुझ्यावर रागावून तो काढून नेला. होशेय *13:9–11*

देवाने त्याच्या क्रोधात इस्राएलाला राजा दिला याचा काय अर्थ होतो? देवाचा कोप म्हणजे माणसाला हव्या असलेल्या चुकीच्या गोष्टी मिळू देणे. पवित्र शास्त्रामध्ये अनेक ठिकाणी देव मनुष्याला हव्या असलेल्या गोष्टींची आज्ञा देतो असे दाखवते. आणखी एक उदाहरण विचारात घ्या.

> परमेश्वर मोशेला म्हणाला, "मी इस्राएल लोकांना कनान देश देत आहे, तो हेरण्यासाठी माणसे पाठव; त्यांच्या वाडवडिलांच्या प्रत्येक वंशातला एकेक पुरुष पाठव; प्रत्येक जण त्यांच्यातला सरदार असावा. गणना *13:1–2*

हे वचन छोटया संदर्भात वाचल्यावर असे दिसून येते की देवाने इस्राएली लोकांनी कनान देशाची हेरगिरी करावी अशी इच्छा केली होती. पण जेव्हा आपण मोठ्या संदर्भात वाचतो तेव्हा आपल्याला काहीतरी वेगळे दिसते.

> तेव्हा तुम्ही सगळे माझ्याकडे येऊन म्हणालात, 'आम्ही माणसे पुढे पाठवतो म्हणजे ती त्या देशाची माहिती मिळवून कोणत्या मार्गाने आम्हांला जावे लागेल व कोणकोणती नगरे लागतील ह्याची आम्हांला खबर आणतील.' अनुवाद *1:22*

इस्त्राएलाला देशाची हेरगिरी करायची होती, म्हणून देवाने त्यांना जे हवे ते करण्याची आज्ञा दिली. मग देव असे का करतो?

> शिवाय अपराध वाढावा म्हणून नियमशास्त्राचा प्रवेश झाला; तरी जेथे पाप वाढले तेथे कृपा त्यापेक्षा विपुल झाली. रोमकरांस *5:20*

जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या अंतःकरणात पाप असते तेव्हा देवाचे पहिले काम त्या व्यक्तीला त्याचे पाप दाखवणे असते. मानवी हृदयात स्वतःला फसवण्याची क्षमता असते. तो स्वतःच्या पापीपणाने आंधळा असतो. जेव्हा आपण देवाच्या इच्छेच्या बाहेर असतो, तेव्हा तो आपली इच्छा असलेल्या गोष्टींना वाढण्यासाठी आज्ञा देतो आणि त्या गोष्टी का पापी आहेत हे आपण पाहू लागतो. परंतु या गोष्टी चुकीच्या आहेत हे त्या व्यक्तीला कळण्याची संधी

मिळाल्याशिवाय तो असे करत नाही.

ह्या आज्ञांमध्ये देवाची इच्छा आहे असा मनुष्यांद्वारे अर्थ लावला जातो कारण मनुष्य स्वतःच्या पापीपणाबद्दल आंधळी आहेत. ते यावर विश्वास ठेवण्याचे देखील निवडतात कारण नंतर त्यांना देव त्यांच्यासारखा दिसू लागतो आणि ह्यामुळे त्यांच्या पापीपणाचे समर्थन होते.

आम्ही दुसऱ्या अध्यायात शोधून काढले की मृत्यूची बीजे आदामाच्या हृदयात होती. त्याने देवाच्या पुत्रावर अशा कृत्यांची जबाबदारी लावली ज्याबद्दल त्याला विश्वास होता की मृत्युदंडाची शिक्षा आहे आणि देव त्याला मारून टाकेल अशी त्याला भीती होती. मृत्यूपासून बचावासाठी त्याने आपल्या पत्नीवर दोष लाविला. तीला स्वतःच्या जागी मरू देण्यास तो तयार होता. आदामाला वाटले की देवाचा न्याय मृत्यूची मागणी करतो. त्याने असेही तर्क लावले की दोष हलविला जाऊ शकतो आणि देवाने जे कर्ज मागितले आहे यावर विश्वास ठेवणारे दुसरे कर्ज फेडू शकतात. आदामाने त्याच्या हृदयात काय आहे हे पाहावे म्हणून, देवाने यज्ञपद्धतीची आज्ञा दिली. यज्ञपद्धती मनुष्य काय विचार करीत आहे याचे प्रतिबिंब आहे, देव काय विचार करतो ह्याचे नाही. यज्ञपद्धती हा माणसाच्या मनाचा आरसा आहे. या संदर्भात तुम्ही बलिदानांविषयी पवित्र शास्त्रामधील वचनांचा मेल साधू शकता.

> तेव्हा शमुवेल म्हणाला, “परमेश्वराचा शब्द पाळल्याने जसा त्याला संतोष होतो तसा होमांनी व यज्ञांनी होतो काय? पाहा, यज्ञापेक्षा आज्ञा पाळणे बरे; एडक्यांच्या चरबीपेक्षा वचन ऐकणे बरे. *1* शमुवेल *15:22*

देवाची इच्छा आहे की आपण त्याच्या कृपेवर विश्वास ठेवून त्याच्यावर विश्वास ठेवावा आणि त्याचे पालन करावे. त्याला मनुष्यांनी बलिदान देण्याची इच्छा नव्हती, परंतु त्याला त्यांचा पापीपणा दाखवण्यासाठी मनुष्याच्या अंतःकरणात जे आहे त्याची आज्ञा द्यायची होती. पण बलिदान पद्धतीबद्दल देवाने मोशेला या सर्व तपशीलवार सूचना का दिल्या?

> पण तुम्ही मला याजकराज्य, पवित्र राष्ट्र व्हाल. हेच शब्द तू इस्राएल लोकांना सांग.” मग मोशेने येऊन लोकांच्या वडिलांना बोलावले आणि परमेश्वराने त्याला आज्ञापिलेले हे सर्व शब्द त्यांच्यापुढे मांडले. तेव्हा सर्व लोकांनी एकमुखाने उत्तर दिले, “परमेश्वराने सांगितले आहे ते सर्व आम्ही करू.” मोशेने लोकांचे हे शब्द परमेश्वराला कळवले. निर्गम *19:6–8*

जेव्हा परमेश्वर इस्राएलामध्ये आला तेव्हा त्याने सर्वांनी याजक व्हावे आणि करारातील सर्व वचने त्यांना देण्यासाठी त्याच्या कृपेवर विश्वास ठेवावा अशी

त्याची इच्छा होती. परंतु इस्राएलाने देवाला सांगितले की त्याने त्यांना जे काही देण्याचे वचन दिले आहे ते स्वतः त्या गोष्टी ते पूर्ण करतील. देवाने त्यांना जे वचन दिले होते ते लोक स्वतः पूर्ण करतील असे देवाला सांगताना ते खरे तर देवाविरुद्‍ध बंड करत होते.

> तुमच्या पूर्वजांना मी मिसर देशातून बाहेर आणले त्या दिवशी होमबलींविषयी किंवा यज्ञबलींविषयी मी त्यांना काही सांगितले नाही व आज्ञा दिली नाही. तर मी त्यांना एवढीच आज्ञा केली की, 'माझे वचन ऐका, म्हणजे मी तुमचा देव होईन व तुम्ही माझे लोक व्हाल; तुमचे बरे व्हावे म्हणून जो सरळ मार्ग मी तुम्हांला सांगतो त्याने चाला.' तरीपण त्यांनी ऐकले नाही, आपला कान दिला नाही, ते आपल्या संकल्पाप्रमाणे, आपल्या दुष्ट मनाच्या हट्‍टाप्रमाणे चालले, ते मागे गेले, पुढे आले नाहीत. तुमचे पूर्वज मिसर देशातून निघाले तेव्हापासून आजवर माझे सर्व सेवक जे संदेष्टे तुमच्याकडे मी पाठवत आलो, त्यांना मोठ्या निकडीने पाठवत आलो; पण त्यांनी माझे ऐकले नाही, आपला कान दिला नाही, त्यांनी आपली मान ताठ केली व आपल्या पूर्वजांपेक्षा अधिक वाईट केले. यिर्मया *7:22–26*

देवाचे वचन आपल्याला सांगते की ते मिसर देशामधून बाहेर पडले त्याच दिवसापासून त्यांनी देवाच्या इच्छेविरुद्‍ध बंड केले. ज्या रात्री त्यांनी वल्हांडणाच्या कोकरूला खाल्ले, त्यांनी ख्रिस्ताला नकार दिल्याचे प्रकट केले कारण ते त्याला नाकारत होते. ख्रिस्ताच्या नकारानंतर सुमारे १५०० वर्षांनंतर घडलेल्या घटना त्या वल्हांडणाच्या रात्री इस्रायलने जे केले त्याचीच प्रतिकृती होती. ते त्यांच्या दुष्ट अंतःकरणाच्या सल्ल्यानुसार चालले. वल्हांडणाच्या कोकऱ्याविषयी दिलेल्या सूचनांमध्ये ते काय करत आहेत हे देव त्यांना दाखवत होता. हे त्यांच्या पापीपणाचे प्रकटीकरण होते. खरं तर वल्हांडणाचे कोकरू हे देवाच्या कृपा प्रस्तावाला त्यांनी सुरुवातीस नकार दिल्याचे प्रतीक आहे जेव्हा मोशेने मिसर देशामध्ये पहिल्यांदा त्यांच्याशी संपर्क साधला.

> म्हणून इस्राएल लोकांना सांग, 'मी परमेश्वर आहे; मी तुम्हांला मिसरी लोकांच्या बिगारीच्या ओझ्याखालून काढीन, त्यांच्या दास्यातून तुम्हांला मुक्त करीन आणि हात पुढे केलेल्या बाहूने व मोठ्या शिक्षा करून तुमचा उद्‍धार करीन; मी तुम्हांला आपली प्रजा करून घेईन आणि मी तुमचा देव होईन; म्हणजे तुम्हांला मिसरी लोकांच्या ओझ्याखालून काढणारा मी तुमचा देव परमेश्वर आहे हे तुम्हांला कळेल. आणि जो देश अब्राहाम, इसहाक व याकोब ह्यांना देण्याची शपथ हात उभारून मी वाहिली होती त्यात मी तुम्हांला नेईन आणि तो तुम्हांला वतन करून देईन; मी परमेश्वर आहे."' मोशेने हे

> सारे इस्राएल लोकांना सांगितले; पण ते आपल्या मनाच्या संतापामुळे आणि बिकट दास्यामुळे मोशेचे ऐकेनात. निर्गम

इस्राएली लोकांनी त्यांच्या मूर्तिपूजेचा आणि धर्मत्यागाचा पश्चात्ताप करण्याऐवजी त्यांच्या मिसर देशामधील गुलामगिरीसाठी देवाला दोष दिला. जर त्यांच्या अंतःकरणात देवाप्रती त्यांच्या परिस्थितीबद्दल राग आणि दोष वास करत नसेल तर ते वचन दिलेल्या देशाच्या अशा प्रेमळ आणि दयाळू देणगीला का नाकारतील? हे वल्हांडणाच्या कोकरूचे बीज आहेत. 1500 वर्षांनंतर जे घडले त्याप्रमाणेच जर देवाचा पुत्र त्यांच्याकडे प्रत्यक्ष गेला असता तर त्यांनी त्याला तेव्हाही मारले असते.

हे सर्व असूनही, देव त्यांना शिकवू शकला की दाराच्या चौकटीवर शिंपडलेल्या व वधलेल्या कोकऱ्याच्या रक्तावर विश्वास ठेवून तो त्यांचे संरक्षण करेल. त्यांच्या प्रायश्चिताच्या खोट्या कल्पनांद्वारे परमेश्वराने त्यांना त्याच्या दयेबद्दल शिकवले. तो त्यांना त्याची दया आणि कृपेबद्दल शिकवू लागला.

**आज्ञांचा दुसरा संच मनुष्याच्या हातांनी बनविला गेला आणि देवाने त्यावर लिहिले. हे देवाचे कार्य आणि मनुष्याचे कार्य यांचे संयोजन दर्शवते.**



सिनाई पर्वतावर नियमशास्त्र दिल्यानंतर काही आठवड्यांतच त्यांनी सोन्याच्या वासराच्या भोवती नाचून देवाचे आज्ञापालन करण्याचे वचन मोडले. रागाच्या भरात मोशेने देवाने कोरलेल्या दोन पाट्या तोडल्या ज्यावर त्याने दहा आज्ञांचा नियम लिहिले होते.

> परमेश्वर मोशेला म्हणाला, “पहिल्या पाट्यांसारख्या दोन दगडी पाट्या घडवून तयार कर म्हणजे तू फोडून टाकलेल्या पहिल्या पाट्यांवर जी वचने होती ती मी त्यांच्यावर लिहीन. निर्गम *34:1*

आज्ञांचा दुसऱ्या पाट्या मनुष्याच्या हातांनी बनविल्या गेल्या आणि देवाने त्यावर लिहिले. हे देवाचे कार्य आणि मनुष्याचे कार्य यांचे संयोजन दर्शवते. त्यांना सर्व काही मोफत देण्याची देवाची कृपापूर्वक देणगी लोकांनी नाकारली

होती. त्यांची धार्मिकता आणि चांगुलपणा प्रदर्शित करण्यासाठी त्यांना हे करायचे होते. म्हणून देवाने त्यांना त्यांच्या अंतःकरणात असलेल्या गोष्टींची आज्ञा दिली जेणेकरून पाप वाढेल. त्यांचे अंतःकरण त्याग आणि अर्पण यांनी भरलेले होते. सोन्याच्या वासराच्या भोवती त्यांनी हेच केले नाही काय? म्हणून देवाने त्यांना त्यांच्या शारीरिक मनाची व्याप्ती दाखवण्यासाठी अश्या आज्ञा दिल्या.

> तेव्हा जे चांगले नाहीत असे नियम मी त्यांना दिले, ज्यांनी ते जगायचे नाहीत असे निर्णय त्यांना दिले. यहेज्केल *20:25*

हे कसे होऊ शकते की देव त्याच्या लोकांना अशा गोष्टी देतो ज्याद्वारे ते जगू शकत नाहीत? तो त्यांना हव्या त्या गोष्टी देतो. यज्ञ करून देवाला संतुष्ट करण्यासाठी मानवी मन किती दूर जाईल?

> मग राजाने व सर्व लोकांनी परमेश्वरासमोर यज्ञबली अर्पण केले. शलमोन राजाने बावीस हजार बैल व एक लक्ष वीस हजार मेंढरे ह्यांचा यज्ञ केला. अशा रीतीने राजाने व सर्व लोकांनी देवाचे मंदिर समर्पित केले. इतिहास *7:4–5*

देवाला या सर्व गोष्टींची गरज कुठे होती? पवित्र शास्त्र म्हणते की देवाला यज्ञ आणि अर्पणाची इच्छा नव्हती. सुरुवातीला त्याने आदामाला वर्षातून जास्तीत जास्त एकदा त्याच्या मनात काय आहे हे दाखवण्यासाठी कोकरू अर्पण करण्याची आज्ञा दिली.

> हंगामाचे वेळी काईनाने याहवेहला दान देण्यासाठी आपल्या जमिनीतील काही उत्पन्न आणले. हाबेलानेही आपल्या मेंढरातील प्रथम जन्मलेली धष्टपुष्ट मेंढरे आणून परमेश्वराला अर्पण केली. याहवेहने हाबेलाच्या अर्पणास प्रीतीने ग्रहण केले. उत्पत्ती *4:3-4 (MRCV)*

वरील भाषांतरात असे म्हटले आहे की जेव्हा कापणीची वेळ आली तेव्हा ते यायचे आणि यज्ञ करायचे.

> काही काळ लोटल्यावर असे झाले की काइनाने परमेश्वराला शेताच्या उत्पन्नापैकी काही अर्पण आणले. उत्पत्ती *4:3 (MARVBSI)*

शाब्दिक वाचनात "दिवसांच्या शेवटी" किंवा "वर्षाच्या शेवटी" आहे आणि जेव्हा कापणी होते. या उताऱ्यावर जॉन वेस्लीचे भाष्य पहा:

> वेळेच्या प्रक्रियेत— दिवसांच्या शेवटी, एकतर वर्षाच्या शेवटी, जेव्हा ते एकत्र येण्याचा सण ठेवत असत किंवा आठवड्याच्या शेवटी,

सातव्या दिवशी; काही ठराविक वेळी काईन आणि हाबेल आदामकडे येऊन, कुटुंबाचे याजक म्हणून, त्यांच्यापैकी प्रत्येकाने परमेश्वराला अर्पण केले; देवाच्या कृपेचे प्रतीक म्हणून हे आम्हाला असे वाटण्याचे कारण आहे की आदामाला दैवी वेळ व नियुक्ती देण्यात आली होती— जॉन वेस्लीचे भाष्य उत्पत्ती *4:3*

हाच हिब्रू शब्द इतर ठिकाणी वर्षाचा शेवट म्हणून अनुवादित केला आहे..

म्हणून तू वर्षानुवर्ष नेमलेल्या काळी हा विधी पाळावा. निर्गम *13:10*

त्याची आई त्याच्यासाठी एक लहानसा झगा तयार करी आणि दर वर्षी आपल्या पतीबरोबर वार्षिक यज्ञ करायला येई त्या वेळी त्याला तो देत असे. *1* शमुवेल *2:19*

प्रत्येक कुटुंबातील लहान प्राण्यांची संख्या राजाने देऊ केलेल्या 120,000 कोकरे आणि 22,000 बैल अश्या मोठ्या प्रमाणात कशी वाढू शकतात? मनुष्य त्यांच्या कल्पनेतील देवाला संतुष्ट करण्यासाठी स्वतःच्या मुलांचा बळी देण्यास देखील तयार होते. पवित्र शास्त्र काय म्हणते?

हजारो एडके, तेलाच्या दशसहस्र नद्या ह्यांनी परमेश्वराला संतोष होईल काय? माझ्या पातकाबद्दल मी आपला ज्येष्ठ पुत्र देऊ काय? माझ्या जिवाने केलेल्या पापाबद्दल मी आपल्या पोटचे फळ देऊ काय?" हे मनुष्या, बरे काय ते त्याने तुला दाखवले आहे; नीतीने वागणे, आवडीने दया करणे व आपल्या देवासमागमे राहून नम्रपणे चालणे ह्यांवाचून परमेश्वर तुझ्याजवळ काय मागतो? मीखा *6:7–8*

लोकांनी त्याच्यावर विश्वास ठेवावा आणि आज्ञा पाळण्यासाठी त्याची कृपा प्राप्त करावी अशी देवाची इच्छा होती. बलिदानाने संतुष्ट होण्याची त्याची इच्छा नव्हती. याला प्रतिसाद म्हणून मनात येणारे वचन पुढीलप्रमाणे आहे.

नियमशास्त्राप्रमाणे रक्ताने बहुतेक सर्वकाही शुद्ध होते, आणि रक्त ओतल्यावाचून पापक्षमा होत नाही. इब्रीलोकांस *9:22*

रक्त सांडल्याशिवाय माफी, किंवा स्वातंत्र्य नाही असे नियमशास्त्र का शिकवते? कारण नियमशास्त्र हा मानवी हृदयात काय आहे हे दाखवणारा दैवी आरसा आहे.

म्हणून नियमशास्त्रातील कर्मांनी कोणीही मनुष्य देवासमोर नीतिमान ठरणार नाही; कारण नियमशास्त्राच्या द्वारे पापाची जाणीव होते. रोमकरांस *3:20*

नियमशास्त्रातील यज्ञ अर्पण केल्याने मनुष्याला न्याय्य ठरवले जात नाही, तर यज्ञ अर्पण करणे हे आपल्या स्वभावातच आहे हे पाहून त्याबद्दल पश्चात्ताप करणे महत्वाचे आहे. नियमशास्त्र ते बीज उघड करतो जेणेकरून ते कबूल केले जावे. "रक्त सांडल्याशिवाय" क्षमा होऊ शकत नाही अशी मागणी करणारा देव नाही, तर तो मनुष्य आहे जो यावर विश्वास ठेवतो आणि तो त्याग केल्याशिवाय देव त्याला क्षमा करेल यावर विश्वास ठेवू शकत नाही. ज्यांना ऐकावयास कान आहेत त्यांनी समजून घ्यावे.

म्हणून बलिदानांसंबंधीचे नियम आपल्याला मनुष्याच्या पापी अंतःकरणाचे ज्ञान देते. पवित्र शास्त्र काय म्हणते ते आम्हाला आठवते:

> तुमच्या पूर्वजांना मी मिसर देशातून बाहेर आणले त्या दिवशी होमबलींविषयी किंवा यज्ञबलींविषयी मी त्यांना काही सांगितले नाही व आज्ञा दिली नाही. यिर्मया *7:22*

नियमशास्त्रामध्ये लिहिलेल्या सर्व गोष्टींशी हे विधान जुळवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे तोराह (नियमशास्त्र) हा मनुष्याच्या शांती-आधारित मनाचा आरसा आहे हे समजून घेणे आणि त्याला स्वतःमध्ये हे पाप दाखवणे.

देवाला संतुष्ट करण्यासाठी एखाद्या गोष्टीचा त्याग करण्याची व मारण्याची इच्छा असलेल्या मनुष्याचा भ्रष्ट स्वभाव असूनही, या भ्रष्टतेद्वारे देव त्यांना त्याच्या क्षमा करण्याच्या इच्छेबद्दल मनुष्याला शिकवू शकला आणि कोकऱ्याचे चरित्र प्रदर्शित करणारा मसीहा त्यांना दाखवू लागला. या चरित्राच्या प्रकटीकरणामुळे मनुष्यांची अंतःकरणे देवाकडे वळतील. कारण ते ख्रिस्तामध्ये प्रकट झालेले देवाचे चरित्र आहे जे लोकांची अंतःकरणे देवाकडे वळवते आणि त्यांना देवामध्ये एक बनवते. म्हणूनच ख्रिस्त त्याच्या मृत्यूच्या आदल्या रात्री म्हणू शकतो:

> सार्वकालिक जीवन हेच आहे की, तू जो एकच खरा देव त्या तुला व ज्याला तू पाठवलेस त्या येशू ख्रिस्ताला त्यांनी ओळखावे. जे काम तू मला करायला दिलेस ते पुरे करून मी पृथ्वीवर तुझा गौरव केला आहे. योहान *17:3–4*

जर ख्रिस्ताने मरणाच्या आदल्या रात्री त्याच्या पित्याने त्याला दिलेले काम पूर्ण केले तर देवाला त्याच्या पुत्राच्या मृत्यूची गरज नव्हती, त्याला फक्त त्याचे प्रेमळ दयाळू चरित्र दाखवण्याची गरज होती. मनुष्याला ख्रिस्ताच्या मृत्यूची गरज होती कारण आपल्या नैसर्गिक अवस्थेत शिक्षेशिवाय क्षमा होऊ शकत नाही. देवाची क्षमा स्वीकारण्यासाठी मानवजातीला येशूचा मृत्यू झालेला पाहावा लागला. अशाप्रकारे येशूच्या मृत्यूपूर्वी तो म्हणाला: “पूर्ण झाले आहे!” (योहान

19:30).

काय संपले होते? त्याने असे कृत्य केले होते की त्यांना क्षमा केली जाऊ शकते यावर विश्वास ठेवण्यासाठी मनुष्याने ते पाहणे आवश्यक होते. म्हणूनच देवाने बलिदानाची आज्ञा दिली कारण मनुष्याला हे पाहण्याची आणि विश्वास ठेवण्याची गरज होती की त्यांच्यासाठी कोणीतरी मरेल.

या प्रश्नाचे खरे महत्त्व समजून घेणे म्हणजे ख्रिस्ताच्या वधस्तंभाला पूर्णपणे भिन्न प्रकाशात सादर करणे, म्हणजे इतका शुद्ध, इतका मौल्यवान व  मुक्त प्रकाश. तुम्ही या प्रकाशात पाऊल टाकाल काय?

# आमच्याकडे नियमशास्त्र आहे

इस्राएली नेत्यांशी एका भेटीत येशू म्हणाला:

> तुम्ही आपला बाप सैतान ह्यापासून झाला आहात आणि तुमच्या बापाच्या वासनांप्रमाणे करू इच्छिता. तो प्रारंभापासून मनुष्यघातक होता आणि तो सत्यात टिकला नाही; कारण त्याच्यामध्ये सत्य नाही. तो खोटे बोलतो तेव्हा तो स्वतःचे बोलतो; कारण तो लबाड व लबाडीचा बाप आहे. योहान *8:44*

जेव्हा इस्राएलाचे नेते येशूशी बोलले तेव्हा त्यांनी सैतानाचे शब्द बोलले कारण येशूने त्यांना सांगितले की सैतान त्यांचा पिता आहे आणि ते त्यांच्या वडिलांच्या, म्हणजेच सैतानाच्या इच्छा पूर्ण करतील. यहुदी नेत्यांचे हे शब्द सैतानाचे मन आणि न्यायाची संपूर्ण मानवी समज प्रतिबिंबित करतात.

> यहूद्यांनी त्याला उत्तर दिले, "आम्हांला नियमशास्त्र आहे; आणि त्या शास्त्राप्रमाणे हा मेला पाहिजे, कारण ह्याने स्वतःला देवाचा पुत्र केले." योहान *19:7*

> तेव्हा त्यांच्यापैकी कयफा नावाचा कोणीएक मनुष्य जो त्या वर्षी प्रमुख याजक होता, तो त्यांना म्हणाला, "तुम्हांला काहीच कळत नाही; प्रजेसाठी एका मनुष्याने मरावे आणि सबंध राष्ट्राचा नाश होऊ नये हे तुम्हांला हितावह आहे, हेही तुम्ही लक्षात आणत नाही." योहान *11:49–50*

इस्राएलच्या नेत्यांनी त्यांच्या मनात येशूचा न्याय केला होता. त्यांच्या नियमशास्त्राच्या वचनानुसार, येशू मृत्यूस पात्र होता. या प्रश्नावर निकोदेमसने

आपल्या सहकारी नेत्यांना आवाहन केले.

> “एखाद्या माणसाचे ऐकून घेतल्यावाचून व तो काय करतो ह्याची माहिती करून घेतल्यावाचून आपले नियमशास्त्र त्याचा न्याय करते काय?” योहान *7:51*

त्यांच्या देशावर रोमन लोकांचे नियंत्रण होते नाहीतर त्यांनी येशूला खूप आधीच मारले असते.

> पिलाताने त्यांना म्हटले, “त्याला नेऊन तुम्हीच आपल्या नियमशास्त्राप्रमाणे त्याचा न्याय करा.” यहूदी त्याला म्हणाले, “आम्हांला कोणाचा जीव घेण्याचा अधिकार नाही.” योहान *18:31*

पुढाऱ्यांनी मोशेच्या नियमाचा अर्थ लावण्याची पद्धत म्हणजे कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना मृत्यूदंडाची शिक्षा देणे असे लावले. अनेक नियमांमध्ये दगडमाराची शिक्षा देखील आहे. जेव्हा येशूने मोशेच्या नियमाचा अर्थ लावला तेव्हा त्याने कायद्याचा वेगळ्या पद्धतीने वापर केला.

> त्या वेळी व्यभिचार करत असताना धरलेल्या एका स्त्रीला शास्त्री व परूशी ह्यांनी त्याच्याकडे आणले व तिला मध्ये उभे करून ते त्याला म्हणाले, “गुरूजी, ही स्त्री व्यभिचार करत असताना धरण्यात आली. मोशेने नियमशास्त्रात आम्हांला अशी आज्ञा दिली आहे की, अशांना दगडमार करावा; तर आपण हिच्याविषयी काय म्हणता?” त्याला दोष लावायला आपणांस काहीतरी मिळावे म्हणून त्याची परीक्षा पाहण्याकरता ते असे म्हणाले. येशू तर खाली ओणवून बोटाने जमिनीवर लिहू लागला. आणि ते त्याला एकसारखे विचारत असता तो उठून त्यांना म्हणाला, “तुमच्यामध्ये जो निष्पाप असेल त्याने प्रथम तिच्यावर दगड टाकावा.” मग तो पुन्हा खाली ओणवून जमिनीवर लिहू लागला. हे शब्द ऐकून वृद्धांतल्या वृद्धापासून तो थेट शेवटल्या माणसापर्यंत ते सर्व एकामागून एक निघून गेले; येशू एकटा राहिला आणि तेथेच ती स्त्री मध्ये उभी होती. नंतर येशू उठला व त्या स्त्रीशिवाय तेथे कोणी नाही असे पाहून तिला म्हणाला, “बाई, तुला दोष देणारे कोठे आहेत? तुला कोणी दंड ठरवला नाही काय?” ती म्हणाली, “प्रभूजी, कोणी नाही.” तेव्हा येशू तिला म्हणाला, “मीही तुला दंड ठरवत नाही; जा; ह्यापुढे पाप करू नकोस.] योहान *8:3–11*

परुश्यांनी या बाईला (आणि पुरुषाला देखील) ते कृत्य करताना पकडले. त्यांच्या नियमशास्त्राच्या समजुतीनुसार तिला दगडाने ठेचून ठार मारले पाहिजे. येशूने मातीमध्ये अशा प्रकारे लिहिले की त्यांना त्यांच्या अपराधांची खात्री पटावी. तिला दगडमार करण्याचा नैतिक अधिकार मिळवण्यासाठी त्यांना पापरहित

असणे आवश्यक आहे हे सांगताना, ते त्यांच्या स्वतःच्या पापाबद्दल दोषी ठरले. क्षमा मागण्याऐवजी, त्यांनी स्वतःला दोषी ठरवले आणि येशूच्या उपस्थितीपासून दूर गेले. त्याने स्त्रीला तिच्या पापाची मुक्तपणे क्षमा केली आणि तिला यापुढे पाप न करण्यास सांगितले. यामुळे स्त्रीला तिच्या तारणकर्त्याबद्दल दिलासा आणि कृतज्ञता मिळाली. ख्रिस्ताने नियमशास्त्राचा वापर तारणासाठी केला, याउलट परुश्यांनी त्याचा वापर खून करण्यासाठी केला.

यावरून देवाचा न्याय आणि सैतानाचा न्याय यातील फरक दिसून येतो. पुष्कळ लोकांचा असा विश्वास आहे की देवाचा न्याय मृत्यूची मागणी करतो. त्यांचा असा विश्वास आहे की दया आणि न्याय एकमेकांच्या विरोधात आहेत आणि जेव्हा जेव्हा देवाची दया संपते, तेव्हा त्याचा नियमशास्त्र दोषींना कठोरपणे शिक्षा करतो.

आपण ह्या शास्त्रवचनाचा विचार करू या.

> *[1]*नीती व न्याय ही तुझ्या राजासनाचा पाया आहेत*;*
>
> *[2]*दया व सत्य तुझे सेवक आहेत*.* स्तोत्रसंहिता *89:14*

राजासनाचा पाया आहेत; ह्या शब्दानंतर अर्धविरामाकडे लक्ष द्या. मराठीमध्ये अर्धविराम दोन स्वतंत्र वाक्यांना वेगळे करतो जेथे दुसरे वाक्य पहिल्याचे स्पष्टीकरण देते. याचा अर्थ देवाच्या न्यायाचे स्पष्टीकरण म्हणजे दया दाखवणे होय. न्याय म्हणजे योग्य गोष्ट करणे आणि देवासाठी योग्य गोष्ट म्हणजे सत्याच्या प्रकाशात दया दाखवणे. मग प्रश्न असा आहे की देवाची दया किती काळ टिकते?

> कारण परमेश्वर चांगला आहे*;* त्याची दया सनातन आहे आणि त्याची सत्यता पिढ्यानपिढ्या टिकते*.* स्तोत्रसंहिता *100:5*
>
> परमेश्वराचे उपकारस्मरण करा*,* कारण तो चांगला आहे*;* कारण त्याची दया सनातन आहे*.* देवाधिदेवाचे उपकारस्मरण करा*;* कारण त्याची दया सनातन आहे*.* प्रभूंच्या प्रभूचे उपकारस्मरण करा*;* कारण त्याची दया सनातन आहे*.* जो एकटाच मोठी अद्भुत कृत्ये करतो त्याचे*;* कारण त्याची दया सनातन आहे*.* ज्याने बुद्धिचातुर्याने आकाश केले त्याचे*;* कारण त्याची दया सनातन आहे*.* स्तोत्रसंहिता *136:1–5*

देवाच्या दृष्टीकोनातून, त्याची दया कधीच संपत नाही, परंतु ज्यांनी त्याला नाकारले त्यांच्यासाठी दयाळू असा दुसरा देव नाही, म्हणून त्यांना त्यांच्या पापांची शिक्षा मिळण्याची अपेक्षा असते आणि देव लोकांच्या चुकीच्या निवडीमुळे त्यांचा पतन होऊ देतो, अशा प्रकारे तो त्यांची स्वतःची न्यायाची

भावना पूर्ण होऊ देतो.

> परमेश्वराने न्यायनिवाडा करून स्वतःला प्रकट केले आहे; दुर्जनास त्याच्याच हातच्या पाशात त्याने गुंतवले आहे. स्तोत्रसंहिता 9:16

दुष्टांसाठी देवाचा न्याय काय आहे? तो त्यांना त्यांच्या स्वतःच्या निर्णयाच्या परिणामात पडू देतो. तो हे रोखत नाही. हे करणे योग्य आहे, नाही काय? जर त्यांनी दया मागितली, तर तो त्यांना ह्या परिणामातून बाहेर पडण्यास मदत करण्यासाठी दया वाढवू शकतो, परंतु जर त्यांनी दयेची अपेक्षा केली नाही आणि दया मागितलीही नाही तर त्यांना ती देऊ केली तरीही ते ती प्राप्त करू शकत नाहीत. दुःखाची गोष्ट म्हणजे बहुतेक लोक असे विचार करतात की देव आपल्यासारखा आहे. त्यांना वाटते की देवाचा न्याय आपल्यासारखाच आहे.

> असे तू केलेस तरी मी उगा राहिलो; मी तुझ्यासारखाच आहे असे तुला वाटले; तथापि मी तुझा निषेध करीन. मी तुझी कृत्ये तुझ्यापुढे मांडीन. स्तोत्रसंहिता 50:21

जर देवाचा न्याय मृत्यूची मागणी करतो, तर देव मृत्यूचा लेखक असेल. जर देवाचा नियम मोडल्याबद्दल एखाद्या व्यक्तीला ठार मारण्याचा देवाचा हेतू असेल तर, मृत्यूचे तत्त्व देवामध्ये अस्तित्वात आहेत. परंतु जेव्हा आपण येशूमध्ये पित्याचे प्रकटीकरण पाहतो तेव्हा आपल्याला फक्त जीवन दिसते. आम्हाला मृत्यू दिसत नाही.

> येशूने तिला म्हटले, "पुनरुत्थान व जीवन मीच आहे; जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो मेला असला तरी जगेल; योहान 11:25

> जे प्रारंभापासून होते, जे आम्ही ऐकले आहे, जे आम्ही आपल्या डोळ्यांनी पाहिले आहे, जे आम्ही न्याहाळले व आपल्या हातांनी चाचपले, त्या जीवनाच्या शब्दाविषयी आम्ही सांगतो; ते जीवन प्रकट झाले, ते आम्ही पाहिले आहे, व त्याची आम्ही साक्ष देतो; ते सार्वकालिक जीवन पित्याजवळ होते व आम्हांला प्रकट झाले, ते तुम्हांला कळवतो; 1 योहान 1:1–2

देवाने पापासाठी मृत्यूची आज्ञा तयार केली नाही. पाप आत्म-नाशी आहे. पापाचे वेतन हे मरण आहे. ही अशी गोष्ट आहे जी पापात गुंतून मिळवली जाते. पाप स्वतःची मजुरी देते, देव नाही. पवित्र शास्त्र असे म्हणत नाही की पापासाठीचे वेतन मरण आहे, ते म्हणते की पापाचे वेतन मरण आहे. ह्यात अफाट फरक आहे.

पवित्र शास्त्र आपल्याला जुन्या कराराच्या कथांद्वारे प्रकट करते की मृत्यूचा हुकूमशाही जगात कशी आली.

धीराच्या व शास्त्रापासून मिळणाऱ्या उत्तेजनाच्या योगे आपण आशा धरावी म्हणून जे काही शास्त्रात पूर्वी लिहिले ते सर्व आपल्या शिक्षणाकरता लिहिले. रोमकरांस *15:4*

अपराधासाठी शिक्षा म्हणून मृत्यूची कल्पना आणणारा सैतान आहे. सिंहाच्या गुफेत दानिएलाच्या कथेद्वारे मृत्यूची कल्पना कशी आणली गेली याची प्रक्रिया आपण लक्षात घेऊयात.

दारयावेश राजाने आपल्या मर्जीप्रमाणे आपल्या सर्व साम्राज्यात एकशे वीस प्रांताधिकारी नेमले; त्यांच्यावर तीन अध्यक्ष नेमले, दानीएल त्यांपैकी एक होता; राजाचे काही नुकसान होऊ नये म्हणून प्रांता-धिकाऱ्यांनी आपला हिशोब त्या तिघांना द्यावा असे ठरवले. दानीएल त्या अध्यक्षांत व प्रांताधिकाऱ्यांत श्रेष्ठ ठरला, कारण त्याच्या ठायी उत्तम आत्मा वसत होता; त्याला सर्व राज्यावर नेमावे असा राजाचा विचार होता. असे असता राज्यकारभारासंबंधाने दानिएलाविरुद्ध काही निमित्त शोधण्याचा प्रयत्न त्या अध्यक्षांनी व प्रांताधिकाऱ्यांनी चालवला; पण त्यांना काही निमित्त किंवा दोष सापडेना; कारण तो विश्वासू असून त्याच्या ठायी काही चूक किंवा अपराध सापडला नाही. तेव्हा ती माणसे म्हणाली, “ह्या दानिएलाविरुद्ध काही निमित्त काढता येणार नाही; मात्र त्याच्या देवाच्या नियमासंबंधाने त्याच्याविरुद्ध काही निमित्त काढता आले तर येईल.” मग हे अध्यक्ष व प्रांताधिकारी राजाकडे जमावाने आले व त्याला म्हणाले, “दारयावेश महाराज, चिरायू असा. राज्यातले सर्व देशाध्यक्ष, नायब अधिपती, प्रांताधिकारी, मंत्री व सरदार ह्यांनी असा विचार केला आहे की अशी एक राजाज्ञा व्हावी, व अशी सक्त द्वाही फिरवली जावी की, हे राजा, ‘तीस दिवसपर्यंत आपल्याशिवाय कोणत्याही देवाची अथवा मानवाची आराधना कोणी करील तर त्याला सिंहाच्या गुहेत टाकावे.’ दानीएल *6:1–7*

ही कथा आपल्या शिकण्यासाठी लिहिली आहे. दारयावेश हा देव पित्याला दर्शवतो आणि दानीएल हा ख्रिस्ताला दर्शवतो. दानीएल हा राजाच्या नंतर सर्वोच्च स्थानावर होता आणि राजाने त्याला संपूर्ण राज्यावर अधिकारी बनवण्याचा विचार केला. ह्यामुळे दानीएलाच्या अधीन असलेल्या सेवकांमध्ये मत्सर निर्माण झाला. या मत्सरामुळे दानीएलाच्या अधिपत्याखाली असलेल्या नेत्यांनी दानीएलाला उद्देशून मृत्यूचे फर्मान काढले. राजाने ही योजना आखली नव्हती, परंतु ती त्याच्यासमोर मांडली गेली आणि त्याचे परिणाम न समजता त्याने त्यांना परवानगी दिली. ख्रिस्ताचा नाश करण्याच्या सैतानाच्या ह्या

प्रयत्नांचे परिणाम देवाला माहीत होते. सैतानाला देवाच्या पुत्राचा हेवा वाटला आणि त्याने अनेक देवदूतांना ख्रिस्ताचा पाडाव करण्याच्या प्रयत्नात सहभागी होण्यास प्रभावित केले. जेव्हा सैतानाने मानवजातीला आपल्या जाळ्यात ओढले, तेव्हा देवाने सैतानाची ही योजना अंमलात येऊ दिली ज्यामुळे ख्रिस्ताचा मृत्यू होईल. बहुतेक जगाला वाटते की ख्रिस्ताचा मृत्यू देवाची मागणी पूर्ण करण्यासाठी आहे, परंतु प्रत्यक्षात ख्रिस्ताचा मृत्यू नाश करणाऱ्या सैतानाच्या गुप्त इच्छा प्रकट करण्यासाठी आहे.

सैतानाला त्या क्षणी त्याचा सर्वात मोठा विजय वाटला, त्याने स्वतःची खुनी रचना उघड केली आणि स्वर्गात त्याच्याबद्दलची सर्व सहानुभूती नाहीशी झाली.

> तेव्हा ज्या माणसांनी दानिएलावर आरोप आणला होता त्यांना राजाज्ञेवरून पकडून आणले आणि त्यांना व त्यांच्या बायकामुलांना सिंहांच्या गुहेत टाकले; तेव्हा ते सिंहांच्या तडाक्यात सापडून त्या गुहेच्या तळाशी पोहचण्यापूर्वीच सर्वांच्या हाडांचा त्यांनी चुराडा केला. दानीएल *6:24*

दारयावेश राजाने दानीएलला मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांना त्यांनी जशी योजना केली होती त्याचप्रमाणे शिक्षा केली. आपला स्वर्गीय पिता सैतानाला ख्रिस्तासाठी उद्देशून असलेल्या नाशाचा अनुभव घेऊ देईल. ख्रिस्त रात्रभर सिंहाच्या गुफेत होता. दानीएलाप्रमाणे तो पुनरुत्थानाच्या सकाळी गुफेतून बाहेर आला आणि ज्यांनी त्याचा नाश करण्याचा प्रयत्न केला त्यांचा पराभव केला.

या कथेचा मुद्दा असा आहे की देवाच्या पुत्राच्या अधिपत्याखाली असलेल्या व्यक्तींनी पित्याचा आदर न करणाऱ्यांना मृत्यूची कल्पना दिली. देवाने ही योजना तयार केली नाही, परंतु सर्वांपासून लपलेल्या सैतानाच्या ह्या योजनांचा पर्दाफाश करण्यासाठी त्याने ह्यासर्वांची परवानगी दिली. बाबेलाच्या राज्यपालांचे नियमशास्त्र राजाला न्याय देण्यासाठी होते. ते त्याच्या न्यायाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी होते; परंतु ही न्यायाची एक खोटी भावना होती ज्याद्वारे शेवटी ज्यांनी ते तयार केले त्यांचाच नाश झाला.

जुन्या करारातील आणखी एका कथेत आपण राजा आणि त्याच्या एका मुलाच्या न्यायातील फरक पाहतो.

> अबशालोम नित्य पहाटेस उठून वेशीकडे जाणाऱ्या रस्त्यात उभा राही आणि कोणी फिर्यादी दाद मागण्यासाठी राजाकडे आला म्हणजे त्याला बोलावून *“*तू कोणत्या नगराचा आहेस,*”* असे विचारी*;* तेव्हा तो म्हणे, *“*तुझा दास इस्राएलाच्या अमुक अमुक वंशातला आहे.*”* तेव्हा अबशालोम त्याला म्हणे, *“*पाहा, तुझे प्रकरण चांगले व वाजवी आहे*;*

> पण तुझे ऐकून घेण्यासाठी राजाच्या वतीने कोणी मनुष्य नेमलेला नाही.” अबशालोम त्याला आणखी म्हणे, “मला ह्या देशात न्यायाधीश केले असते तर किती बरे झाले असते? एखाद्याने आपला कज्जा किंवा प्रकरण माझ्याकडे आणले असते तर मी त्याला न्याय दिला असता.” एखादा त्याला मुजरा करायला जवळ येई तेव्हा तो आपला हात पुढे करून त्याला धरून त्याचे चुंबन घेई. इस्राएलातले जे जे लोक राजाकडे न्याय मागण्यासाठी येत त्या सर्वांशी तो असाच वागे; ह्या प्रकारे अबशालोमाने इस्राएल लोकांची मने हरण केली. *2* शमुवेल *15:2–6*

अबशालोम नावाचा अर्थ शांतीचा पिता आहे, परंतु या नावाच्या आड द्वेष आणि युद्ध लपलेले होते. अबशालोमची बहीण तामार हिच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आपल्या सावत्र भाऊ अम्नोनला त्याच्या वडिलांनी शिक्षा करावी अशी अबशालोमची इच्छा होती. दावीद राजाने अम्नोनविरुद्ध शिक्षा न केल्यामुळे, अबशालोमने आपल्या वडिलांचा तिरस्कार केला आणि त्याला उध्वस्त करण्याचा निर्धार केला. अबशालोमने प्रकरण स्वतःच्या हातात घेतले आणि अम्नोनला मारून टाकले. मग त्याने इस्राएल राज्याची मने जिंकण्याचा प्रयत्न केला.

> अबशालोमाने त्याला एवढा आग्रह केला की त्याने अम्नोनास व सर्व राजकुमारांना त्याच्याबरोबर जाऊ दिले. अबशालोमाने आपल्या सर्व सेवकांना अशी ताकीद देऊन ठेवली होती की, “सावध राहा, अम्नोन द्राक्षारस पिऊन रंगात आला म्हणजे मी तुम्हांला इशारा केल्याबरोबर तुम्ही अम्नोनावर प्रहार करून त्याला ठार करा, काही भिऊ नका; मी तुम्हांला हुकूम करतो आहे ना? हिंमत धरा, शौर्य दाखवा.” अबशालोमाच्या आज्ञेप्रमाणे त्याच्या चाकरांनी अम्नोनाचे केले. तेव्हा सर्व राजकुमार उठून आपापल्या खेचरांवर बसून पळून गेले. *2* शमुवेल *13:27–29*

सैतान, जो मूळतः लूसिफर होता, देवाच्या पुत्राला उंच करण्यात आल्याने ते नाखूष होता. त्याच्यावर अन्याय झाला आहे असे त्याला वाटले आणि त्याने देवाच्या पुत्राचा पाडाव करण्याचा निर्धार केला. जेव्हा राजाने ह्यामध्ये हस्तक्षेप केला आणि त्याचा निर्णय स्पष्ट केला तेव्हा लुसिफरने त्याचे राज्य उलथून टाकण्याचा निर्धार केला. त्याने अनेक देवदूतांना आपल्या बाजूने जिंकले. ही समस्या निष्पक्षतेची होती.

> “मला ह्या देशात न्यायाधीश केले असते तर किती बरे झाले असते? एखाद्याने आपला कज्जा किंवा प्रकरण माझ्याकडे आणले असते

तर मी त्याला न्याय दिला असता." 2 शमुवेल *15:4*

राजा त्याच्या प्रजेला न्याय देत नव्हता असा अबशालोमचा आग्रह होता, पण हा दावा खोटा होता. यापूर्वी शमुवेलच्या पुस्तकात आपण वाचतो की:

दाविदाने सर्व इस्राएलावर राज्य केले; तो आपल्या सर्व प्रजेशी न्यायाने व निष्पक्षपातीपणे वागे. *2* शमुवेल *8:15*

दावीद आपल्या प्रजेला न्याय देत होता, पण अबशालोमाला ज्या न्यायाची गरज होती ते हे नव्हते. दावीदाने दया दाखवली कारण देवाची दया त्याच्याबरोबर होती आणि त्याने त्याचे राज्य स्थापन केले:

तो माझ्या नामाप्रीत्यर्थ मंदिर बांधील, मी त्याचे राजासन कायमचे स्थापीन. मी त्याचा पिता होईन व तो माझा पुत्र होईल; त्याने अधर्म केल्यास, मनुष्य जशी दंडाने व मानवपुत्र जशी फटक्यांनी शिक्षा करतात तशी मी त्याला शिक्षा करीन; पण तुझ्यापुढून घालवून दिलेल्या शौलावरची कृपादृष्टी मी दूर केली तशी त्याच्यावरची माझी कृपादृष्टी दूर होणार नाही. तुझे घराणे व तुझे राज्य ही तुझ्यापुढे अढळ राहतील; तुझी गादी कायमची स्थापित होईल." *2* शमुवेल *7:13–16*

अबशालोमाला दया दाखवणाऱ्या न्यायावर उभारलेले राज्य नको होते. त्याला असा न्याय हवा होता जो अन्याय करणाऱ्यांना दयामाया न ठेवता मृत्यू देईल. ही कथा स्वर्गातील मूळ युद्ध प्रतिबिंबित करते. सैतानाने अनेक देवदूतांना हे पटवून दिले की राज्य सुरक्षित करण्यासाठी न्यायाविषयीचे त्याचे विचार आवश्यक आहेत. अबशालोमाने आपल्या देशाला खात्री दिली की न्यायाबद्दलच्या त्याच्या कल्पना राज्य सुधारतील आणि त्याने इस्राएली लोकांची मने वळविली. सैतानाने अनेक देवदूतांची मने वळविली आणि बाकीचे देवदूत त्याच्या कल्पनांबद्दल उत्सुक होते आणि त्याच्याबद्दल सहानुभूती दाखवत होते. आपल्याला हे माहित आहे कारण सैतानाने देवाच्या पुत्राचा खून करेपर्यंत त्याला स्वर्गातून पूर्णपणे नाकारण्यात आले नव्हते. त्यानंतरच त्याला पृथ्वीवर टाकण्यात आले.

तेव्हा त्याने त्यांना म्हटले, "सैतान आकाशातून विजेसारखा पडला हे मी पाहिले. लूक *10:18*

त्याच्या शेपटाने 'आकाशातील ताऱ्यांपैकी एक तृतीयांश तारे' ओढून काढून ते 'पृथ्वीवर पाडले'; ती स्त्री प्रसूत होईल तेव्हा तिचे मूल खाऊन टाकावे म्हणून तो अजगर त्या प्रसवणाऱ्या स्त्रीपुढे उभा राहिला होता. सर्व 'राष्ट्रांवर लोखंडी दंडाने राज्य करील' असा पुत्र

> म्हणजे पुंसंतान ती प्रसवली*;* ते तिचे मूल देवाकडे व त्याच्या राजासनाकडे वर नेण्यात आले*.* प्रकटीकरण *12:4–5*

सैतानाने एक तृतीयांश देवदूतांना शारीरिकरित्या त्याच्यासोबत घेतले होते. त्याने पृथ्वीवरील मंडळींवर हल्ला केला आणि बेथलेहेममध्ये जन्मलेल्या देवाचा पुत्र ह्यांचा नाश करण्याचा प्रयत्न केला. ख्रिस्त स्वर्गात परतल्यानंतर सैतानाला स्वर्गातील सर्वांच्या मनातून काढून टाकण्यात आले.

> मग स्वर्गात युद्ध सुरू झाले*;* *'*मीखाएल*'* व त्याचे दूत अजगराबरोबर *'*युद्ध करण्यास*'* निघाले*,* आणि त्यांच्याबरोबर अजगर व त्याचे दूत लढले*;* तरी त्यांचे काही चालले नाही*,* आणि स्वर्गात त्यांचे ठिकाणही उरले नाही*.* मग तो मोठा अजगर खाली टाकण्यात आला*,* म्हणजे सर्व जगाला ठकवणारा*,* जो दियाबल*1* व सैतान म्हटलेला आहे तो जुनाट *'*साप*'* खाली पृथ्वीवर टाकण्यात आला व त्याच्याबरोबर त्याच्या दूतांना टाकण्यात आले*.*
>
> तेव्हा मी स्वर्गात मोठी वाणी ऐकली*;* ती म्हणाली*, "*आता आमच्या देवाने सिद्ध केलेले तारण*,* त्याचे सामर्थ्य व त्याचे राज्य आणि त्याच्या ख्रिस्ताचा अधिकार हे प्रकट झाले आहेत*;* कारण आमच्या बंधूंना दोष देणारा*,* आमच्या देवासमोर रात्रंदिवस त्यांच्यावर दोषारोप करणारा*,* खाली टाकण्यात आला आहे*.* प्रकटीकरण *12:7–10*

ख्रिस्त आणि त्याचे देवदूत आणि सैतान आणि त्याचे देवदूत यांच्यात काळाच्या सुरुवातीला युद्ध झाले होते. एक तृतीयांश देवदूत लूसिफरच्या मागे अंधारात गेले आणि त्यांनी स्वर्ग सोडले.

> आणि ज्या देवदूतांनी आपले अधिकारपद न राखता आपले वसतिस्थान सोडले*,* त्यांना त्याने निरंतरच्या बंधनात*,* निबिड काळोखामध्ये महान दिवसाच्या न्यायाकरता राखून ठेवले*.* यहूदा *1:6*

देवाने त्यांना हाकलून लावले हे खरे आहे, परंतु ते ज्या खोट्या गोष्टींवर विश्वास ठेवू लागले त्याद्वारे त्यांना बाहेर टाकण्यात आले (प्रकटीकरण 12:4). देवाने त्यांच्या मनातील इच्छा पूर्ण केल्या. त्यांनी देव कठोर आणि निर्दयी असल्याची कल्पना केली आणि ते त्यांनी स्वतः बनविलेल्या देवाच्या खोट्या प्रतिमेपासून पळून गेले.

सैतानाने स्वतःचे सिंहासन स्थापन करण्याचा विचार केला होता ज्यामध्ये न्यायाच्याबाबतीत त्याच्या वेगवेगळ्या कल्पनांचा समावेश होता. त्याला देवाच्या सर्व निर्मितीवर राज्य करायचे होते.

> जो तू आपल्या मनात म्हणालास, 'मी आकाशात चढेन, देवाच्या तारांगणाहून माझे सिंहासन उच्च करीन, उत्तर भागातील देवसभेच्या पर्वतावर मी विराजमान होईन; मी मेघांवर आरोहण करीन, मी परात्परासमान होईन;' यशया *14:13–14*

अबशालोमच्या कथेवरून असे सूचित होते की संपूर्ण राष्ट्र त्याच्या न्यायाच्या कल्पनांनी प्रभावित होते. पृथ्वीचा प्रतिनिधी म्हणून सैतान अजूनही स्वर्गात येऊ शकतो ही वस्तुस्थिती दर्शवते की त्याच्या कल्पना स्वर्गातील देवदूतांनाही पूर्णपणे समजल्या नाहीत.

> एक दिवस असा आला की त्या दिवशी देवपुत्र परमेश्वरापुढे येऊन उभे राहिले, व त्यांच्यामध्ये सैतानही आला. परमेश्वर सैतानाला म्हणाला, "तू आता कोठून आलास?" सैतानाने परमेश्वराला उत्तर दिले, "मी पृथ्वीवर इकडेतिकडे हिंडूनफिरून आलो आहे." ईयोब *1:6–7*

स्वर्गीय बैठकीमध्ये सैतानाची उपस्तीथी ही त्याच्या वडिलांच्या उपपत्नींना घेऊन जाण्याची आणि शाही वंश भ्रष्ट करण्याच्या प्रयत्नात अबशालोमच्या कृतीचे प्रतिबिंब आहे.

> अहीथोफेलाने अबशालोमाला म्हटले, "ज्या उपपत्नी तुझा पिता मंदिराच्या रक्षणास ठेवून गेला आहे त्यांच्यापाशी जा; तुझ्या बापाला तुझा वीट आला असे सर्व इस्राएल लोक ऐकतील तेव्हा तुझ्याबरोबरच्या सर्वांच्या हातांना जोर येईल." अबशालोमासाठी राजमंदिराच्या धाब्यावर एक तंबू दिला आणि सर्व इस्राएलांदेखत अबशालोम आपल्या पित्याच्या उपपत्नींपाशी गेला. *2* शमुवेल *16:21-22*

सैतानाचे शब्द मनाचे बीज होते आणि त्यांच्या शब्दांचा विश्वावर प्रभाव होता. आदामात पेरलेल्या देवाच्या पुत्राविरुद्ध खुनाचे बीज 4000 वर्षांनंतर ख्रिस्ताच्या वधस्तंभावरील मृत्यूमध्ये प्रकट होईपर्यंत, कोणालाच सैतानाचे हेतू खरोखरच ज्ञात नव्हते. यामुळे सैतानाला स्वतःची वैशिष्ट्ये देवावर लादण्यास अनुमती मिळाली. जोपर्यंत सैतान आपली खरी ओळख लपवू शकतो तोपर्यंत देव खरोखर कसा आहे याविषयी फसवणूक करण्याची शक्ती त्याच्याकडे होती. त्याच्याकडे ही शक्ती आहे कारण तो देवदूतांपैकी पहिला होता आणि इतर देवदूतांना त्याच्या देवाबद्दलच्या ज्ञानावर विश्वास होता. यामुळेच त्याला देवाच्या नियमाद्वारे दुष्कर्म घडवण्याची परवानगी मिळाली.

> न्याय करण्याच्या मिषाने, उपद्रव योजून अन्याय करणाऱ्या न्यायासनाचा तुझ्याशी काही संबंध असेल काय? स्तोत्रसंहिता *94:20*

सैतान अधर्माच्या सिंहासनावर बसला आणि देवाच्या नियमशास्त्राचे वापर करून कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल मृत्यूची आज्ञा असावी असा त्याने आग्रह धरला. सिंहाच्या गुहेत दानीएलाची कथा ही प्रक्रिया प्रकट करते. अबशालोमच्या कथेवरून असे दिसून येते की राज्यामधील लोकांची हृदये सुरक्षित करण्यासाठी न्यायाचा मुद्दा पुढे आणला होता. या सर्व कथा स्वर्गात सुरू झालेल्या आणि नंतर पृथ्वीवर आलेल्या युद्धाचे प्रतिबिंब आहेत. संघर्षातील मुद्दे बदललेले नाहीत.

तरीही ख्रिस्ताच्या मृत्यूनंतर, सैतानाचे खरे हेतू उघड झाले. ख्रिस्ताने विश्वाला देवाचे खरे प्रेमळ चरित्र प्रकट केले. ख्रिस्ताने दाखवून दिले की देव त्याच्या शत्रूंवर प्रेम करतो; त्याने दुसरा गाल पुढे केला आणि कोणत्याही आत्मसंरक्षणाशिवाय त्याने नम्रपणे स्वत: ला सर्वात भयानक मृत्यूच्या स्वाधीन केले. सैतान, आणि त्याच्या देवदूत ह्यांच्या ख्रिस्तासोबतच्या पृथ्वीवरील वागणुकीमध्ये सैतानाचे खरे चरित्र उघड झाले. ख्रिस्ताच्या दैवी प्रकटीकरणाने त्याचे चरित्र पूर्णपणे विरुद्ध असल्याचे दर्शवले. अशा प्रकारे, मृत्यूद्वारे ख्रिस्ताने ज्याच्याकडे मृत्यूचे सामर्थ्य आहे त्याचे राज्य नष्ट केले.

> ज्या अर्थी ‘मुले’ एकाच रक्तमांसाची होती त्या अर्थी तोही त्यांच्यासारखा रक्तमांसाचा झाला, हेतू हा की, मरणावर सत्ता गाजवणारा म्हणजे सैतान, ह्याला मरणाने शून्यवत करावे, इब्रीलोकांस *2:14*

परुश्यांना सैतानाच्या न्यायाच्या कल्पनांची सवय झाली होती. म्हणूनच त्यांच्यामध्ये ख्रिस्ताला मारण्याची इच्छा होती. ख्रिस्ताने त्यांना मारण्याचा प्रयत्न केला नाही किंवा त्याने त्यांना मारण्याची धमकीही दिली नाही.

> तेव्हा प्रमुख याजक उठून त्याला म्हणाला, “तू काहीच उत्तर देत नाहीस काय? हे तुझ्याविरुद्ध साक्ष देतात हे काय?” तथापि येशू उगाच राहिला. ह्यावरून प्रमुख याजकाने त्याला म्हटले, “मी तुला जिवंत देवाची शपथ घालतो, तू देवाचा पुत्र ख्रिस्त असलास तर आम्हांला सांग.”' येशू त्याला म्हणाला, “होय, आपण म्हटले तसेच. आणखी मी तुम्हांला सांगतो, ह्यापुढे तुम्ही ‘मनुष्याच्या पुत्राला सर्वसमर्थाच्या उजवीकडे बसलेले’ व ‘आकाशाच्या मेघांवर आरूढ होऊन येताना पाहाल.”' तेव्हा प्रमुख याजकाने आपली वस्त्रे फाडून म्हटले, “ह्याने दुर्भाषण केले आहे; आम्हांला साक्षीदारांची आणखी काय गरज? पाहा, आता तुम्ही हे दुर्भाषण ऐकले आहे. तुम्हांला काय

> वाटते?” त्यांनी उत्तर दिले की, “हा मरणदंडास पात्र आहे.” मत्तय *26:62–66*

जेव्हा येशू परुश्यांना त्याच्या गौरवात येण्याबद्दल सांगतो तेव्हा तो फक्त असे म्हणतो की ते त्याला पाहतील. दुसरीकडे परुशी ख्रिस्ताला मृत्युदंड देतात. हा विरोधाभास जोरदार आहे. जे शोधतात त्यांच्यासाठी पुरावे भरपूर आहेत. देवाचा न्याय मृत्यूची मागणी करत नाही तर सैतानाची न्याय व्यवस्था मृत्यूची मागणी करते. सैतानाचा आणि त्याच्या राज्याच्या न्यायव्यवस्थेचा द्वेष प्रकट करण्यासाठी देवाने त्याच्या पुत्राला मरणाची परवानगी दिली.

या संदर्भात वधस्तंभाचा अर्थ बदलला आहे. न्यायाचे समाधान करण्यासाठी देवाला ख्रिस्ताच्या मृत्यूची आवश्यकता नव्हती. तरीही पुरुषांनी सांगितले की आमच्याकडे एक कायदा आहे: आम्ही मानव म्हणून आमच्या अंतःकरणात एक कायदा लिहिलेला आहे ज्याला क्षमा करण्यासाठी मृत्यू आवश्यक आहे.

> तरी माझ्या अवयवांत मला निराळाच नियम दिसतो; तो माझ्या मनातल्या नियमाबरोबर लढतो आणि मला कैद करून माझ्या अवयवांतील पापाच्या नियमाच्या स्वाधीन करतो. किती मी कष्टी माणूस! मला ह्या मरणाधीन असलेल्या देहापासून कोण सोडवील? रोमकरांस *7:23–24*

तुम्ही या मृत्यूच्या नियमापासून मुक्त व्हाल काय? अपराध्याला मृत्यूची मागणी करणाऱ्या न्याय व्यवस्थेपासून तुम्ही मुक्त व्हाल काय? वधस्तंभावरील येशूकडे पहा आणि न्याय समाधानासाठी आवश्यक असलेली खंडणीची किंमत पाहा. हा सैतानाचा न्याय होता जो वधस्तंभावर समाधानी झाला कारण तो अपहरणकर्ता होता ज्याने देवाच्या लेकरांच्या हृदयाचे अपहरण केले आणि खंडणीची मागणी केली. बंदिवान म्हणून, आम्हाला अपहरणकर्त्याच्या दाव्यावर विश्वास होता की केवळ मृत्यूच आम्हाला मुक्त करू शकतो. देवाने मुक्तीची किंमत ठरवली नाही, तर सैतानाने ठरवली.

# जसे मोशेने वाळवंटात सर्प उंचविला

देव त्यांना क्षमा करेल हे मानवजातीला समजावे म्हणून सैतानाच्या न्यायाच्या कल्पना पूर्ण करण्यासाठी येशू मरण पावला, आणि आता आम्ही त्या खांबावरील सर्पाविषयी येशूच्या शब्दांचे परीक्षण करण्यास तयार आहोत.

> जसा मोशेने अरण्यात सर्प उंच केला होता तसे मनुष्याच्या पुत्रालाही उंच केले पाहिजे; योहान *3:14*

बऱ्याच पवित्र शास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी, येशूला वधस्तंभावर खिळले जाणे आणि खांबावर उचलून घेतलेला सर्प यांच्यातील समांतरता खूप रहस्यमय वाटते. ह्या दोन्ही घटना कश्या जुडलेल्या आहेत?

> मग होर डोंगरापासून कूच करून अदोम देशाला वळसा घालून जाण्यासाठी त्यांनी तांबड्या समुद्राकडचा मार्ग धरला; त्या वाटेत लोकांचे मन अधीर झाले. ते परमेश्वराविरुद्ध व मोशेविरुद्ध असे बोलू लागले की, "तुम्ही आम्हांला मिसर देशातून काढून ह्या रानात मरायला कशाला आणले? येथे तर अन्न नाही व पाणीही नाही, आणि ह्या हलक्या अन्नाला आम्ही कंटाळलो आहोत." तेव्हा परमेश्वराने लोकांमध्ये आग्ये साप पाठवले; त्यांच्या दंशाने इस्राएलातील बरेच लोक मेले. हे पाहून लोक मोशेकडे येऊन म्हणाले, "परमेश्वराविरुद्ध व तुझ्याविरुद्ध बोलण्याचे पाप आम्ही केले आहे; तेव्हा हे साप आमच्यामधून काढून टाकण्यासाठी परमेश्वराची प्रार्थना कर." तेव्हा मोशेने लोकांसाठी प्रार्थना केली. परमेश्वर मोशेला म्हणाला, "आग्या सापाची एक प्रतिमा करून झेंड्याच्या खांबावर टांग म्हणजे सर्पदंश

> झालेल्या कोणा माणसाने त्याच्याकडे पाहिले तर तो जगेल." मग मोशेने पितळेचा एक साप बनवून टांगला, तेव्हा सर्पदंश झालेल्या कोणी त्या पितळेच्या सापाकडे पाहिले म्हणजे तो जगे. गणना *21:4–9*

सर्प येण्याचे कारण म्हणजे लोकांनी कुरकुर केल्यामुळे त्यांच्याभवती असलेले संरक्षणाचे कुंपण तोडले गेले:

> जो खड्डा खणतो तोच त्यात पडतो; जो कुंपण तोडतो त्याला सर्प डसतो. उपदेशक *10:8*

जे देवाच्या आज्ञांचे पालन करून त्याचा आदर करतात त्यांच्याभोवती त्याच्या देवदूतांचे संरक्षण असते. जेव्हा लोक सतत त्याच्या आज्ञा मोडतात तेव्हा देवदूत त्या लोकांचे रक्षण करू शकत नाहीत.

> परमेश्वराचा दूत त्याचे भय धरणाऱ्यांसभोवती छावणी देतो आणि त्यांचे संरक्षण करतो. स्तोत्रसंहिता *34:7*

> परमेश्वराचे भय ज्ञानाचा आरंभ होय. त्याप्रमाणे जे वर्ततात त्या सर्वांना सुबुद्धी प्राप्त होते. त्याचे स्तवन सर्वकाळ चालते. स्तोत्रसंहिता *111:10*

देवाने सर्पांना पाठवले नाही, परंतु त्याने त्यांना येण्याची परवानगी दिली कारण त्याच्या आज्ञा मोडल्यामुळे देवदूत इस्राएली लोकांचे रक्षण करण्यास सक्षम नव्हते. पण लोकांना वाटले की देवानेच सर्पांना पाठवले. अपराधाला शिक्षा झालीच पाहिजे ही त्यांची न्यायाची समज होती. म्हणून, त्यांना वाटले की त्यांच्या पापामुळे देव त्यांना सक्रियपणे मृत्यू देत आहे. मोशेला पितळी/पितळाचा सर्प बनवण्याची आज्ञा देण्यात आली होती. हा धातू फार महत्त्वाचा आहे कारण तो जमिनीत नैसर्गिकरित्या आढळणारा धातू नाही. हे देवाने बनवलेल्या दोन धातूंचे म्हणजेच तांबे आणि जस्त ह्यांचे मिश्रण आहे. ह्या धातूला निर्माण करणारा काईनच्या पुत्रांपैकी एक होता.

> सिल्ला हिलाही तुबल-काइन झाला; तो तांब्याची, लोखंडाची व सर्व प्रकारची धारदार हत्यारे घडवणारा झाला; आणि तुबल-काइनास नामा नावाची बहीण होती. उत्पत्ती *4:22*

पितळ हा मानवनिर्मित धातू आहे जो देवाने निर्माण केलेल्या आणि एकत्र केलेल्या घटकांपासून घेतलेला आहे. पितळ हा एक असा धातू आहे ज्याचा कधीकधी पवित्र शास्त्रात नकारात्मक उल्लेख होतो. आज्ञाभंगाच्या शापांच्या यादीत पवित्र शास्त्रामध्ये ह्याचा उल्लेख असा आहे:

> तुझ्या डोक्यावरचे आकाश पितळेसारखे व तुझ्या पायांखालची जमीन लोखंडासारखी होईल*. अनुवाद 28:23*

इस्राएलाचा धर्मत्याग आणि त्यांनी केलेल्या नियमशास्त्राच्या उल्लंघनाची यादी केल्यानंतर, देव त्यांना सांगतो:

> *“*मानवपुत्रा*,* इस्राएल घराणे माझ्या दृष्टीने केवळ गाळ झाले आहे*;* भट्टीतील पितळ*,* कथील*,* लोखंड व शिसे ह्यांसारखे ते सर्व आहेत*,* ते रुप्यातील गाळ झाले आहेत*.* यहेज्केल *22:18*

पितळाचा बनवलेला सर्प, जो सैतानाचे प्रतीक आहे, तो मानव निर्मित सैतानाच्या नियमांच्या न्यायाचे प्रतिनिधित्व करतो.

> मग तो मोठा अजगर खाली टाकण्यात आला*,* म्हणजे सर्व जगाला ठकवणारा*,* जो दियाबल*1* व सैतान म्हटलेला आहे तो जुनाट *‘*साप*’* खाली पृथ्वीवर टाकण्यात आला व त्याच्याबरोबर त्याच्या दूतांना टाकण्यात आले*.* प्रकटीकरण *12:9*

काही इस्राएली लोकांना सर्पांनी मारल्यानंतर आणि त्यांनी कुरकुर केल्याबद्दल पश्चात्ताप केल्यानंतर त्यांना असा विश्वास होता की पापाचा सामना झाला आहे. त्यांनी उंच केलेल्या सर्पाला त्यांच्या पापांचा नाश करणारा म्हणून ओळखले. ज्यांना मारले गेले ते या पापांसाठी यज्ञ असे होते. या मानवनिर्मित किंवा पितळाच्या कल्पनेद्वारे, देव त्यांना शिकवू शकला की त्यांना त्यांच्या पापांची क्षमा मिळू शकते आणि म्हणून, ते बरे देखील होऊ शकतात. त्यांना हे समजले नाही की त्यांची न्यायाची कल्पना ही सैतानाकडून आहे, म्हणून देवाने त्यांच्याच न्यायाची कल्पना वापरली आणि त्यांना पश्चात्ताप करण्यास व बरे होण्यास प्रवृत्त केले.

त्याच प्रकारे, ख्रिस्ताला वर उचलण्यात आले आणि त्याला सर्पाच्या न्यायाच्या अधीन केले गेले ज्याद्वारे आपण वधस्तंभाकडे पाहावे आणि आपल्याला क्षमा केली जाऊ शकते यावर आपण विश्वास ठेवावे. केवळ देवाच्या पुत्राच्या बलिदानामुळेच आपण देवाच्या क्षमेवर विश्वास ठेवू शकतो आणि आध्यात्मिक स्वातंत्र्य प्राप्त करू शकतो.

आपल्या नैसर्गिक अवस्थेत, येशूने आपल्या पापांसाठी प्रायश्चित्त प्रदान केले. हे

प्रायश्चित्त पितळाच्या सर्पाचे प्रतीक आहे कारण हीच आपल्या स्वातंत्र्याची म्हणजे आपल्या अपहरणकर्त्याची किंमत होती. हे सर्पाच्या न्यायाचे पितळाद्वारे केलेल्या समाधानाचा पुरावा आहे. ह्या न्याय स्वर्गनिर्मीत नाही तर मनुष्याने आणि विशेषत: काईनच्या वंशाचे बनवलेला आहे.

या अध्यायात आपल्या पापांसाठी ख्रिस्ताला का मरावे लागले हे समजून घेण्यासाठी पूर्णपणे नवीन दृष्टीकोन देण्यात येत आहे. ख्रिस्ती मंडळी ह्यावर ठाम आहे की देवाला आपल्या तारणासाठी त्याच्या पुत्राचा मृत्यू आवश्यक होता. तरीही पवित्र शास्त्र आपल्याला स्पष्टपणे सांगते कि:

> यज्ञपशू व अन्नार्पण ह्यांत तुला संतोष नाही; तू माझे कान उघडले[2] आहेस; होम व पापाबद्दल अर्पण ही तू मागत नाहीस. स्तोत्रसंहिता *40:6*

देवाला या मृत्यूची आवश्यकता नव्हती, परंतु आपण सैतानाच्या प्रभावाखाली आल्यानंतर केवळ त्याच्या पुत्राच्या बलिदानाच्या मृत्यूद्वारेच तो आपल्याला त्याची क्षमा पटवून देऊ शकतो हे देवाला माहित होते.

**ख्रिस्ताला वर उचलण्यात आले आणि त्याला सर्पाच्या न्यायच्या अधीन करण्यात आले जेणेकरून आपण वधस्तंभाकडे पाहावे आणि आपल्याला क्षमा केली जाऊ शकते यावर आपण विश्वास ठेवावे.**



जर देवाला त्याच्या स्वत: च्या पुत्राच्या मृत्यूची आवश्यकता असेल, तर यज्ञांचे अर्पण देवाच्या उपासनेमध्ये कायमचे स्थापित होईल. पण घडले अगदी उलट. ख्रिस्ताच्या मृत्यूमुळे पापासाठी यज्ञ अर्पण करण्याचे संपूर्ण तत्त्व बंद झाले.

> तो पुष्कळ लोकांबरोबर एक सप्तकाचा पक्का करार करील; अर्ध सप्तकापर्यंत तो यज्ञ व अन्नबली बंद करील; दानीएल *9:27*

ख्रिस्त यज्ञ आणि अर्पण समाप्त करेल. ख्रिस्ताला वर उचलण्यात आले आणि

त्याने सर्व माणसांना त्याच्याकडे ओढले (योहान 12:32). एकदा आपली पितळाच्या न्यायाची प्रणाली समाधानी झाली आणि आपण क्षमा स्वीकारली मग, आपल्याला देवाचा आत्मा मिळू शकतो आणि आपले अंतःकरण बदलू शकते. आपण आता सैतानाच्या हाताखाली नाही. एकदा का आपले अंतःकरण बदलले की आपल्याला यापुढे खडकावर प्रहार करण्याची गरज नाही तर फक्त त्याच्याशी बोलण्याची गरज आहे.

> "आपली काठी घे. तू व तुझा भाऊ अहरोन मिळून मंडळी जमा करा. त्यांच्यादेखत तुम्ही त्या खडकाला आज्ञा करा म्हणजे त्यातून पाणी निघेल; ह्याप्रमाणे त्यांच्यासाठी खडकातून पाणी काढ. ह्या मंडळीला व त्यांच्या जनावरांना पाज." गणना *20:8*

दुःखाची गोष्ट म्हणजे, मोशेने देवाच्या सूचनांचे पालन केले नाही आणि तो खडकाशी बोलला नाही. लोकांच्या कुरकुर मुळे त्याला राग आला आणि त्याने त्यागाचे प्रतीकात्मक कृत्य म्हणून खडकावर प्रहार केला. यामुळे खऱ्या न्यायाचा आणि त्याच्या पूर्ततेचा गैरसमज कायम राहिला. म्हणूनच देवाला मोशेला स्वर्गात जाण्यापूर्वी मरणाची परवानगी द्यावी लागली. या समजुतीतील खोटेपणा लोकांनी ओळखणे गरजेचे होते. त्यांना हे समजून घेणे आवश्यक होते की देवाची इच्छा आहे की त्यांनी थेट त्याच्याशी संवाद साधावा, कोणालाही न मारता त्यांनी फक्त क्षमा मागावी.

मनुष्याची ही दुर्बलता देवाच्या योजनांना उलथून टाकत नाही. खरं तर, तो आपल्याला ख्रिस्ताकडे आणण्यासाठी आपल्याच न्याय व्यवस्थेसह कार्य करतो. मारलेल्या खडकाच्या रचनेत देव आपल्याला या विश्वासाकडे आकर्षित करतो की आपल्याला क्षमा केली जाते आणि नंतर जीवनाचे पाणी खडकातून मुक्तपणे वाहते, जो ख्रिस्त येशू आहे.

> आणि ते सर्व तेच आध्यात्मिक पाणी प्याले. कारण ते आपल्यामागे चालणाऱ्या आध्यात्मिक खडकातून पीत होते; तो खडक तर ख्रिस्त होता. ह्या गोष्टींविषयी तुम्ही अजाण असावे अशी माझी इच्छा नाही. *1* करिंथकरास *10:4*

> ह्यावरून आपण विश्वासाने नीतिमान ठरवले जावे म्हणून नियमशास्त्र आपल्याला ख्रिस्ताकडे पोहचवणारे बालरक्षक होते. परंतु आता विश्वासाचे आगमन झाले आहे म्हणून आपण ह्यापुढे बालरक्षकाच्या अधीन नाही. गलतीकरांस *3:24–25*

ताठ मानेच्या लोकांसाठी मोशेला दिलेली सेवा म्हणजेच देवाच्या नियमाच्या आरशात मानवी पापीपणा वाढवणे.

> जिचा लेख दगडांवर कोरलेला असून जिचे पर्यवसान मृत्यूत होत असे ती सेवा एवढी तेजस्वी होती की 'मोशेच्या चेहऱ्याचे तेज' नाहीसे होत चालले असूनही इस्राएल लोकांना जर त्याच्या चेहऱ्याकडे टक लावून पाहवेना, *2* करिंथकरास *3:7*

माणसाला स्वतःचे अपराध दिसणे ही गौरवाची गोष्ट आहे. नैसर्गिक माणूस त्याच्या स्वत: च्या दुष्टपणाला आंधळा आहे, परंतु मोशेद्वारे दिलेले नियमशास्त्र आपल्याला ख्रिस्तामध्ये सुवार्तेच्या मोठ्या गरजेबद्दल जागृत करतो. तो एक दैवी व धन्य आरसा आहे जो आपली पतित अवस्था प्रकट करतो. या आरशाशिवाय, आपण वाचू शकत नाही कारण आपल्याला आपली धोकादायक स्थिती माहित नसते.

> कारण नियमशास्त्र मोशेच्या द्वारे देण्यात आले होते*;* कृपा व सत्य हे येशू ख्रिस्ताच्या द्वारे आले*.* योहान *1:17*

अर्थात येशूची कृपा जगाच्या स्थापनेपूर्वीपासून उपलब्ध आहे आणि आज आपल्याला आपली हरवलेली स्थिती शिकवण्यासाठी नियमशास्त्रातील ह्या आरशाची गरज आहे.

> त्याने आमच्या कृत्यांप्रमाणे नव्हे तर स्वत*:*च्या संकल्पाप्रमाणे व कृपेप्रमाणे आम्हांला तारले व पवित्र पाचारणाने पाचारले आहे*;* ही कृपा युगांच्या काळापूर्वी ख्रिस्त येशूच्या ठायी आपल्यावर करण्यात आली होती*; 2* तीमथ्य *1:9*

मनुष्याच्या पतनाच्या सुरुवातीपासून ते आजपर्यंत नियमशास्त्र आणि शुभवर्तमान दोन्ही एकत्र कार्यरत आहेत. मनुष्याचे देवाबरोबरचे नाते पुनर्स्थापीत करण्यासाठी ह्या दोघांचीही गरज आहे.

पितळाच्या सर्पाची कथा अनेक कारणांनी महत्त्वाची आहे. सैतानाने मांडलेल्या आणि मानवतेने स्वीकारलेल्या न्याय तत्त्वाच्या मागण्यांसाठी ख्रिस्ताला उचलून धरण्यात आले हे आपल्याला दिसून येते. इस्त्राएलाच्या उपासनेच्या केंद्रस्थानी असलेल्या पितळाच्या सर्पाचे परीक्षण करताना, आपल्या प्रेमळ पित्याने आपल्या पुत्राचा मृत्यू व्हावा असे ठरवले नव्हते, तर आपण ह्याद्वारे विश्वास ठेवू शकतो म्हणून स्वइच्छेने त्याचे समर्पण केल्याचे अतिरिक्त पुरावे आपल्याला आढळतात.

> ज्याने आपल्या स्वतःच्या पुत्रास राखून न ठेवता त्याला आपल्या सर्वांकरता समर्पण केले*,* तो त्याच्याबरोबर आपल्याला सर्वकाही कसे देणार नाही*?* रोमकरांस *8:32*

# हे देवा, तुझे मार्ग पवित्र आहेत

लहानपणी मी केलेले पवित्र शास्त्राचे वाचन मला आठवते. जेव्हा मी निर्गमाच्या पुस्तकापर्यंत पोहोचलो तेव्हा मला खूप कठीण वाटले. देवाचे पवित्रस्थान बनवण्याच्या सर्व सूचना वाचणे 12 वर्षांच्या मुलासाठी अत्यंत कंटाळवाणे होते. तरीही या सूचनांमध्ये एक मौल्यवान सत्य आहे जे आपल्यासाठी शुभवर्तमानाचे स्पष्टीकरण देते. आपल्याला माहित आहे की एक चित्र हजार शब्द रंगवते; त्यामुळे पुढील पानावर काही चित्रे आहेत ज्यामुळे आम्हाला पवित्रस्थानाचे झटपट प्रदर्शन मिळेल.

पवित्रस्थानाच्या वस्तूंसाठी वापरल्या जाणाऱ्या धातूंची नोंद घेणे मनोरंजक आहे.

| वस्तू | वापरलेले धातू | स्थान |
|---|---|---|
| यज्ञ वेदी | पितळ | अंगण |
| गंगाळ | पितळ | अंगण |
| दीपस्तंभ | सोने | पवित्र स्थान |
| समक्षतेच्या भाकरीचा मेज | सोने | पवित्र स्थान |
| धूपाची वेदी | सोने | पवित्र स्थान |
| कराराचा कोश | सोने | अती पवित्र स्थान |

# निवासमंडप



## सोन्याचे वस्तू



समक्षतेच्या भाकरीची वेदी

## पितळाचे वस्तू



अर्पणाची वेदि



धूपवेदी



दीपस्तंभ



धुण्याचे गंगाळ



अतिपवित्र स्थान



कराराचा कोश

निवासमंडपाच्या भिंती चांदीच्या खोबनामध्ये एकत्र ठेवलेल्या सोनेरी पट्यांनी मढवलेल्या होत्या.

> मग निवासमंडपासाठी बाभळीच्या लाकडाच्या उभ्या फळ्या कराव्यात. प्रत्येक फळीची लांबी दहा हात व रुंदी दीड हात असावी. एक फळी दुसरीशी जोडण्यासाठी तिला दोन-दोन कुसे असावीत; निवासमंडपाच्या सर्व फळ्या अशाच कराव्यात. निवासमंडपासाठी ज्या फळ्या तू करशील त्यांपैकी वीस फळ्या दक्षिण बाजूसाठी असाव्यात. ह्या वीस फळ्यांच्या खाली लावण्यासाठी चांदीच्या चाळीस उथळ्या बनवाव्यात म्हणजे एकेका फळीच्या खाली कुसांसाठी दोन-दोन उथळ्या असतील. त्या फळ्या सोन्याने मढवाव्यात आणि अडसर लावण्याच्या कड्या सोन्याच्या बनवाव्यात, अडसरही सोन्याने मढवावेत. निर्गम *26:15–19, 29*

निवासमंडपात वापरलेले आतील पडदे सोन्याने तर बाहेरील पडदे पितळाचे होते.

> निवासमंडप दहा पडद्यांचा कर. ते कातलेल्या तलम सणाच्या कापडाचे आणि निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगांच्या सुताचे तयार करावेत व त्यांवर कुशल कारागिरांकडून करूब काढवावेत. तसेच सोन्याचे पन्नास आकडे बनवावेत आणि ह्या आकड्यांनी पडदे एकमेकांना अशा प्रकारे जोडावेत की सर्व मिळून निवासमंडप अखंड होईल. निर्गम *26:1, 6*

> निवासमंडपावरच्या तंबूसाठी बकऱ्यांच्या केसांचे पडदे करावेत; हे पडदे अकरा असावेत. आणि पितळेचे पन्नास आकडे करावेत, ते बिरड्यांत घालून तंबू असा जोडावा की तो अखंड होईल. तंबूच्या पडद्यांचा लोंबत राहिलेला भाग म्हणजे उरलेला अर्धा पडदा निवासमंडपाच्या मागच्या बाजूला लोंबता सोडावा; निर्गम *26:7,11–12*

जे शुभवर्तमानाद्वारे पवित्र केले जातात त्यांच्या चरित्रामधून सर्व पितळ काढून टाकले जाते. त्यांचे शब्द शुद्ध असतात.

> रुपेरी करंड्यात सोन्याची फळे, तसे समयोचित भाषण होय. सोन्याचे कर्णभूषण आणि उत्कृष्ट सोन्याचा दागिना, तसा सुज्ञ उपदेशक लक्ष देणाऱ्या कानाला आहे. नीतिसूत्रे *25:11–12*

निवासमंडपाच्या बाहेरील पडदे ज्यामध्ये अजूनही पितळ आहे ते आपल्या शरीराचे प्रतिनिधित्व करतात. देवाच्या दुसऱ्या येण्याच्या वेळी, हे पितळी धागे काढून टाकले जातील कारण आपले नाशवंत शरीर अमरत्व धारण करेल.

> पाहा, मी तुम्हांला एक रहस्य सांगतो*;* आपण सर्वच महानिद्रा घेणार नाही, तरी आपण सर्व जण बदलून जाऊ*;* क्षणात, निमिषात, शेवटला कर्णा वाजेल तेव्हा. कारण कर्णा वाजेल, मेलेले ते अविनाशी असे उठवले जातील, आणि आपण बदलून जाऊ. कारण हे जे विनाशी त्याने अविनाशीपण परिधान करावे, आणि हे जे मर्त्य त्याने अमरत्व परिधान करावे हे आवश्यक आहे*. 1* करिंथ *15:51–53*

स्वर्गीय शहर शुद्ध सोन्याचे बनलेले असेल जे तेथे राहणाऱ्या लोकांच्या चरित्राचे प्रतिबिंब असेल.

> तिचा 'तट यास्फे' रत्नाचा होता*;* आणि नगरी शुद्ध काचेसारखी शुद्ध सोनेच होती. प्रकटीकरण *21:18*
>
> म्हणून मी तुला मसलत देतो की, श्रीमंत होण्यासाठी तू अग्नीने शुद्ध केलेले सोने माझ्यापासून विकत घे*;* प्रकटीकरण *3:18*

आपण मागील अध्यायात नमूद केल्याप्रमाणे, पितळ हे मनुष्याचे उत्पादन आहे (उत्पत्ति 4:22). हा धातू मनुष्याच्या विचारानुसार देवाच्या गोष्टी एकत्र करण्याचे प्रयत्न दर्शवितो. देवाकडे जाण्याचा मार्ग पवित्रस्थानात आहे. जसजसे आपण बाहेरच्या अंगणापासून परम पवित्र स्थानाकडे जातो तसतसे पितळ शुद्ध केले जाते आणि फक्त सोने आणि चांदी उरते. जसजसे आपण ख्रिस्ती वाटचालीमध्ये प्रगती करतो तसतसे आपण अंगण मागे सोडले पाहिजे कारण ते परराष्ट्रीयांसाठी सोडले जाते.

> नंतर काठीसारखा एक 'बोरू' कोणीएकाने मला दिला, आणि म्हटले *:* "ऊठ, देवाचे मंदिर, वेदी व त्यात उपासना करणारे लोक ह्यांचे माप घे. तरी मंदिराबाहेरचे अंगण सोड, त्याचे माप घेऊ नकोस*;* कारण ते 'परराष्ट्रीयांना दिले' आहे*;* आणि ते बेचाळीस महिने पवित्र नगरी 'तुडवतील*.'* प्रकटीकरण *11:1–2*

अंगण परराष्ट्रीय लोकांसाठी आहे. हे ते ठिकाण आहे जेथे पितळी विचाराने दूषित व पापी लोक प्रथम शुभवर्तमान समजतात. बलिदानाची वेदी ख्रिस्ताच्या वधस्तंभाचे प्रतिनिधित्व करते. वधस्तंभ पितळ धातूद्वारे दर्शविला जातो. त्यामुळे ती मानवनिर्मित वस्तू आहे; ही अशी गोष्ट आहे जी माणसाला त्याच्या न्यायाची तत्त्वे पूर्ण करण्यासाठी आवश्यक आहेत. वधस्तंभाला सामोरे

गेल्यानंतर, देव पितळी गंगाळामध्ये आढळलेल्या आरशात आपला पापीपणा वाढवतो.

> त्याने गंगाळ व त्याची बैठक पितळेची बनवली. दर्शनमंडपाच्या दाराजवळ सेवा करीत असलेल्या स्त्रियांच्या आरशांचे हे पितळ होते. निर्गम *38:8*

माणसे नियमशास्त्राच्या प्रकाशात स्वत:कडे पाहतात तेव्हा त्यांची स्वनिंदेची भावना एवढी वाढते की ते त्यांच्या जीवनाबद्दल निराश होतात. जेव्हा ख्रिस्ताचा आत्मा आत येतो तेव्हा आपण पापाबद्दल गंभीरपणे दोषी ठरतो.

> तो येऊन पापाविषयी, नीतिमत्त्वाविषयी व न्याय-निवाड्याविषयी जगाची खातरी करील योहान *16:8*

जे लोक देवाच्या क्षमेवर मनापासून विश्वास ठेवतात, त्यांच्या हताशपणामध्ये यज्ञवेदीकडे टक लावून पाहत असतात, म्हणून त्यांच्यासाठी कृपा विपुल होते. ते त्यांच्या आत्म्यात खरा विश्वास मिळवू लागतात, जो जीवनातील दुःखाच्या परीक्षांमधून खरेदी केलेला विश्वास असतो.

> शिवाय अपराध वाढावा म्हणून नियमशास्त्राचा प्रवेश झाला; तरी जेथे पाप वाढले तेथे कृपा त्यापेक्षा विपुल झाली. रोमकरांस *5:20*

जसजसा आपला विश्वास मजबूत होत जातो, तसतसे आपल्या पूर्वीच्या पापी विचारांचे अवशेष (पितळ) हळूहळू शुद्ध होते जोपर्यंत आपण शेवटी पापाच्या जाणीवेतून मुक्त होत नाही तोपर्यंत.

> ते समर्थ असते तर एकदा शुद्ध झालेल्या उपासकांना त्यानंतर पापाची भावना नसल्याने ते यज्ञ करणे बंद झाले नसते काय? इब्रीलोकांस *10:2*

या टप्प्यावर, यज्ञ आणि विधींची गरज कमी होते, त्याची जागा देवाशी थेट आणि वैयक्तिक नातेसंबंधाने घेतली जाते.

> परंतु त्या यज्ञांमुळे वर्षानुवर्षे पापांची आठवण होत आहे; कारण बैलांचे व बकऱ्यांचे रक्त पापे दूर करण्यास असमर्थ आहे. म्हणून तो जगात येतेवेळेस म्हणाला, “यज्ञ व अन्नार्पणे ह्यांची तुला इच्छा नव्हती, तू माझ्यासाठी शरीर तयार केलेस; होमांनी व पापाबद्दलच्या अर्पणांनी तुला संतोष नव्हता. ह्यावरून मी म्हणालो, हे देवा, ग्रंथपटात माझ्याविषयी लिहून ठेवले आहे, तुझ्या इच्छेप्रमाणे करण्यासाठी मी आलो आहे.” वर उल्लेखल्याप्रमाणे तो

> म्हणाला, “यज्ञ, अन्नार्पणे, होम व पापाबद्दलची अर्पणे ह्यांची इच्छा तुला नव्हती व त्यांत तुला संतोष नव्हता” (ती नियम-शास्त्राप्रमाणे अर्पण करण्यात येतात); मग तो म्हणाला, “[हे देवा,] पाहा, मी तुझ्या इच्छेप्रमाणे करण्यास आलो आहे.” ह्यात दुसरे स्थापण्यासाठी तो पहिले नाहीसे करतो. त्या इच्छेने आपण येशू ख्रिस्ताच्या एकदाच झालेल्या देहार्पणाद्वारे पवित्र केलेले आहोत. इब्रीलोकांस *10:3–10*

पितळी वेदीवर पितळी सर्पाचे प्रतीक म्हणून येशू एकदाच मरण पावला. परंतु जेव्हा आत्म्याने भरले जातो, तेव्हा वधस्तंभाबद्दलची आपली समज खूप खोलवर बदलते. म्हणजे ख्रिस्ताचा आत्म-नकार आणि त्याच्यामध्ये पित्याच्या सुंदर स्वभावाचे प्रकटीकरण. बलिदानाची वेदी (खडकावर मारणे) धूपाच्या वेदीने बदलले जाते (खडकाशी बोलणे) - कालवरी येथे रक्त सांडणे हे गेथसेमेनी येथे रक्त सांडण्याच्या संदर्भात आणले जाते जेथे येशूने त्याच्या पित्याने त्याला दिलेले काम पूर्ण केले .

> जे काम तू मला करायला दिलेस ते पुरे करून मी पृथ्वीवर तुझा गौरव केला आहे. योहान *17:4*

प्रिय पापी वर पाहा आणि जगा. देवाने आपल्या पुत्राला जगाची निंदा करण्यासाठी जगात पाठवले नाही (योहान 3:16–17). सोन्याच्या वेदीच्या चौकटीत, देवाने त्याच्या पुत्राला त्याचे चरित्र प्रकट करण्यासाठी आणि आपले अपराध स्वतःवर घेण्यासाठी पाठवले जेणेकरून आपण देवाच्या क्षमेवर विश्वास ठेवू शकू.

आमच्या प्रिय पित्याने आपल्या पुत्राला हे सांगण्यासाठी पाठवले नाही की "तुमच्या पापांसाठी मी तुमच्यासोबतही असेच केले असते, परंतु मी माझ्या रागाच्या भरात माझ्या मुलाला मारण्याचा निर्णय घेतला." कोणता बाप आपल्या मुलांशी असा वागेल? स्वर्गीय दृष्टीकोनातून, वधस्तंभाचे चिंतन करा आणि त्याचे अतुलनीय मूल्य पहा, हे दृश्य तुम्हाला आनंदाच्या अश्रूंनी रडवेल.

जेव्हा आपण पितळाच्या अंगणातून बाहेर पडून आणि सोन्या-चांदीच्या पवित्र स्थानात जाऊ तेव्हा आपल्याला दिसेल की देवाचा न्याय मनुष्यांपेक्षा खूप वेगळा आहे. आम्हाला सांगितले जाते की:

> दुर्जन आपला मार्ग सोडो, अधर्मी आपल्या कल्पनांचा त्याग करो आणि परमेश्वराकडे वळो म्हणजे तो त्याच्यावर दया करील; तो आमच्या देवाकडे वळो, कारण तो त्याला भरपूर क्षमा करील. कारण

माझ्या कल्पना तुमच्या कल्पना नाहीत; माझे मार्ग तुमचे मार्ग नाहीत, असे परमेश्वर म्हणतो. कारण आकाश जसे पृथ्वीहून उंच आहे, तसे माझे मार्ग तुमच्या मार्गांहून आणि माझ्या कल्पना तुमच्या कल्पनांहून उंच आहेत. पाहा, पाऊस व बर्फ आकाशातून पडतात; आणि पृथ्वी भिजवून, तिला सफळ व हिरवीगार केल्यावाचून, पेरणाऱ्यास बीज, खाणाऱ्यास भाकरी दिल्यावाचून ती परत वर जात नाहीत, त्याप्रमाणे माझ्या मुखातून निघणारे वचन होईल; ते माझी इच्छा पूर्ण केल्यावाचून व ज्या कार्यासाठी मी ते पाठवले ते केल्यावाचून माझ्याकडे विफल होऊन परत येणार नाही. तसे तुम्ही आनंदाने निघाल, शांतीने मिरवत जाल; पर्वत व टेकड्या तुमच्यापुढे जयघोष करतील; वनातील सर्व वृक्ष टाळ्या वाजवतील. काटेऱ्याच्या जागी सरू उगवेल, रिंगणीच्या जागी मेंदी उगवेल; ह्यावरून परमेश्वराचे नाव होईल; ते सर्वकाळचे चिन्ह होईल, ते कधी नष्ट होणार नाही." यशया *55:7–13*

मी कळकळीने प्रार्थना करतो की तुम्हाला ख्रिस्ताचा वधस्तंभ अधिक व्यापक, अधिक तेजस्वी प्रकाशात, पतित मानवतेच्या आणि देवदूतांच्या विकृत न्यायापासून मुक्त करील. आपल्या पित्याच्या प्रेमळ व  मधुर प्रकाशात या जेथे आगपे परमेश्वराकडे सर्व भीती दूर करण्याची शक्ती आहे.

आश्चर्यकारक कृपा, किती गोड
आवाज ज्याने माझ्यासारख्या दुष्ट
माणसाला वाचवले
मी एके काळी हरवलो होतो, पण आता
सापडलो, आंधळा होतो पण आता बघू
शकतोय
ती कृपा होती जिने माझ्या हृदयाला
भीती बाळगण्यास शिकवले आणि ती
कृपा होती, जिने माझी भीती दूर झाली
ज्या क्षणी मी प्रथम विश्वास ठेवला
त्या क्षणी ही कृपा किती मौल्यवान
होती
अनेक संकटे, कष्ट आणि सापळे
यातून आपण आधीच आलो आहोत.
ती कृपा होती ज्याने आम्हाला
आतापर्यंत सुरक्षित केले आणि कृपा
आम्हाला घरी घेऊन जाईल.

आश्चर्यकारक कृपा, किती गोड
आवाज ज्याने माझ्यासारख्या दुष्ट
माणसाला वाचवले
मी एके काळी हरवलो होतो, पण आता
सापडलो, आंधळा होतो पण आता बघू
शकतोय

# सेलाह

माझ्या प्रिय तारणाऱ्यासाठी,

तूम्ही माझ्या पापाच्या अंधारात माझ्याकडे आलास. तूम्ही मला पित्याच्या क्षमेची खात्री दिली आहे, जी मी समजू शकेन आणि स्वीकारू शकेन. तूम्ही माझ्यासाठी सहन केलेल्या यातनाबद्दल मी दुःखी होऊन रडतो. तुमच्या पित्याच्या करुणेने प्रेरित होऊन तुम्ही तुमच्या हरवलेल्या मेंढरांना सोडवण्यासाठी या जगाच्या अंधारात उतरलात.

आपण आमच्यासाठी जे केले आहे त्याची वास्तविकता समजून घेण्यासाठी मनुष्याचे मन किती मंद आहे. अनंतकाळ तुमच्या प्रेमाची खोली मला प्रकट करू शकत नाही. तुम्ही अंतहीन झरा आहात ज्यातून मी कायम पीत राहीन, आणि त्या पाण्याच्या चवला कधीही कंटाळणार नाही.

हे मौल्यवान कोकरू, तू जेथे जाशील तेथे तुझे अनुसरण करण्याची माझी इच्छा आहे. एवढ्या अगणित किंमतीत तू माझा पाठलाग केला आहेस. जरी कधीकधी मला तुझ्या प्रेमासाठी खूप अयोग्य वाटत असले तरी, मला विश्वास आहे की तू मला कधीही सोडणार नाहीस किंवा मला त्यागणार नाहीस. मला सांत्वन देण्यासाठी आणि आशीर्वाद देण्यासाठी तूमचा मौल्यवान आत्मा पाठवल्याबद्दल धन्यवाद.

प्रिय तारणाऱ्या, माझी मनापासून इच्छा आहे की या संदेशाद्वारे तुम्ही ज्यांना माझ्यावर सोपवले आहे त्यांनीही पित्याच्या राज्यात सामील व्हावे. मी माझ्या अंतःकरणात त्यांच्याबद्दल तुमचे प्रेम अनुभवू शकतो आणि मला त्यांच्या तारणाची मनापासून इच्छा आहे. तुमच्या मुलांवरचे तुमचे प्रेम अनुभवण्याची आणि जगाला आमच्या पित्याला खऱ्या अर्थाने समजून घेण्याच्या तुमच्या इच्छेमध्ये एकरूप होण्याची संधी मिळाल्याबद्दल मी कृतज्ञ व आभारी आहे.

मला तुमचा सौम्य आत्मा द्या म्हणजे मी तुमचे गौरव करू शकेन, जसे तुम्ही आमच्यासाठी पित्याचे गौरव केले. जसे तुम्ही देहात होता तसे तुम्ही आमच्यामध्ये प्रगट व्हावे, जेणेकरून मनुष्यांच्या अंतःकरणाला प्रायश्चित्त प्राप्त व्हावे. कारण तुम्ही आमच्यावर सलोख्याचे काम सोपवले आहे.

ह्या पुस्तकाच्या प्रत्येक वाचकाला वधस्तंभाचे खरे सौंदर्य पाहण्यासाठी आध्यात्मिक अंतर्दृष्टी द्या. आम्ही सर्वांनी तुमच्याबरोबर वधस्तंभावर जाण्याची भीती सोडू द्यावी, जेणेकरून प्रत्येक गुडघा नतमस्तक होईल आणि प्रत्येक जीभ आमच्या प्रिय पित्याच्या गौरवासाठी तुमचे प्रभुत्व कबूल करेल.

प्रभू येशूच्या मौल्यवान नावात,

आमेन.

वधस्तंभ का आवश्यक होता आणि
कोणाला त्याची आवश्यकता होती?

आपल्या तारणासाठी वधस्तंभ का
आवश्यक होता?

का त्याच्या पुत्राच्या मृत्यूने देवाचा क्रोध
शांत झाला?

देवाचा न्याय काय आहे आणि त्याचा
न्याय आपल्या न्यायापेक्षा वेगळा आहे
काय?

येशूने स्वतःची तुलना खांबावरील
अग्नी सर्पाशी का केली?

इस्राएली निवासमंडप आपल्याला
वधस्तंभाबद्दल काय सांगते?

एड्रियन एबेन्स हे ब्रिस्बेन, ऑस्ट्रेलिया येथे राहणारे आंतरराष्ट्रीय लेखक आणि वक्ते आहेत. त्यांनी त्यांची प्रिय पत्नी लॉरेलशी लग्न केलेले आहे आणि त्यांना दोन प्रौढ मुलगे देखील आहेत.